ति

ाङ्मय

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
क्र. नं. ५०९
१९३८

भाग दुसरा

काव्य ११६०
REFBK-0005779
REFBK-0005779

किंमत ३ आणे

सेनापति

# बापट-वाङ्मय

भाग दुसरा

संग्राहक—धुं. वि. देव

प्रसिद्धिदिन १-१-१९३८

REFBK-0005779
REFBK-0005779

किंमत ३ आण

प्रकाशक—

**धुं. वि. देव,**

९७४ सदाशिव पेठ, पुणें २.

## मिळण्याचें ठिकाणः—

सेनापति बापट वाङ्मय प्रकाशक मंडळ,

९७४ सदाशिव पेठ, पुणें २.

किंवा

स्वावलंबी उद्योगमंदिर,

२४१ सदाशिव पेठ, पुणें २.

मुद्रक—

**ल. ना. चाफेकर,**

आर्यसंस्कृति मुद्रणालय,

टिळक रस्ता, पुणें २.

# प्रस्तावना

मम वर्त्माऽनुवर्तन्ते मनुष्याः पार्थ सर्वशः ।

भगवद्गीता.

या दुसऱ्या भागांत १९३१ सालीं गोगटे-प्रकरणामुळें झालेली सात वर्षांची शिक्षा भोगीत असतां सेनापति बापटांनीं रत्नागिरी तुरुंगांत लिहिलेल्या गीतासेवकामधील 'गीताहृदय' व 'अनासक्तियोगपरीक्षण' या दोन प्रकरणांचा समावेश केला आहे. पहिल्या व दुसऱ्या भागांत से. बापटांचें तात्त्विक वाङ्मय संक्षेपानें ग्रथित केलें आहे. या तात्त्विक वाङ्मयाचें अवलोकन करणाराचे कानावर घनगर्जनेप्रमाणें झडणाऱ्या अध्यात्माच्या डंक्याचा आवाज आदळेल. नवीनांस तो आज आवडणार नाहीं पण उद्यां आवडेल अशी आमची खात्री आहे. असो.

विसाव्या शतकांत आधिभौतिक शास्त्रांची विलक्षण

वाढ होऊन आम्ही सांगूं तें सत्य, आम्ही सांगूं ती नीति, आम्ही सांगूं ती उन्नति, आम्ही सांगूं तोच धर्म अशी स्थिति त्यांनीं निर्माण केल्यासारखें झालें आहे. पण निवळ पायांखालींच पाहून मनुष्याचें किंवा मनुष्यसमाजाचें ध्येय कोणतें किंवा पूर्णत्व कशांत आहे हें न पाहूं शकणारीं आणि म्हणूनच सतत चालावयास लावणारीं हीं आंधळीं भौतिक शास्त्रें मनुष्यसमाजास कशीं वारंवार तोंडघशीं पाडीत आहेत, हें यूरोपांत व आशियांत जपानकडे लक्ष फेकल्यास, अर्थ असून अनर्थ, अन्न असून अन्नान्नदशा या स्थितीवरून व जो आसुरी रक्तपात चालू आहे त्यावरून कोणासही कळून येईल. आधिभौतिक ज्ञानानें वाटेल तेवढी सुखसंपत्ति निर्माण करून मनुष्यास येथें अगदीं अनुकूल अशी स्थिति व्यवहारांत प्राप्त करून घेतां येते, पण प्राप्त अनुकूल स्थितीचा उपयोग कसा करावयाचा हें भस्मासुराप्रमाणें भौतिक शास्त्रें जाणूं शकत नाहींत. एखाद्यानें पातंजलयोग साधून निरोगी बनून चित्त लावावयाचें कुठें तें

न कळल्यामुळें ती सर्व आरोग्याची शक्ति एखाद्या कामिनीच्या पाठीस लागून वेंचावी तद्वत् हा प्रकार आहे.

आपण पुढें जात आहोंत कीं मागें जात आहोंत हें आपलें जें ध्येय असेल त्या ध्येयाजवळ आपण किती गेलों यावरूनच ठरवावें लागेल; निवळ एका स्थितींतून भिन्न स्थितींत प्रवेश केल्यानें ठरवितां येणार नाहीं. या दृष्टीनें विचार करितां आपलें म्हणजे मनुष्य समाजाचें ध्येय कोणतें तें ठरवून त्या ध्येयासाठीं ही आधिभौतिक शास्त्रांची जडशक्ति मनुष्यसमाजाप्रीत्यर्थ कशी वापरावयाची एवढेंच काय तें पाहावें लागेल. भौतिक शास्त्रांचें ज्ञान केवळ बाह्यांग सुधारूं शकेल; अंतरंग सुधारण्याची त्यांत काडीइतकीही शक्ति नाहीं हें भौतिक ज्ञानाच्या शिखरावर पोंचलेल्या राष्ट्रांवरून दिसून येईल.

मनुष्याचें पूर्णत्व कशांत आहे किंवा त्याचें ध्येय कोणतें व त्याची त्यास प्रचीति येण्यास मनुष्यसमाजाची वा राष्ट्रांची घटना कशी असावयास पाहिजे हें त्या पूर्ण स्थितीचा अनुभव ज्यांनीं करून घेतला आहे

तेच सांगूं शकतील. अर्थात् हें काम धर्मज्ञांचें–अध्यात्मतत्त्ववेत्त्यांचें–आहे. त्यांच्या संदेशाप्रमाणें सामाजिक व राष्ट्रीय घटना अमलांत आणिली तरच आपण पुढें जाऊं शकूं.

आजच्या आंदोलनात्मक परिस्थितींत वाढणाऱ्या तरुणांचीं मनें पाश्चिमात्यांच्या जड आधिभौतिक यंत्रवादींतून रशियांत उदयास आलेला साम्यवाद खेचीत आहे. आणि तें साहजिक आहे. कारण मराठ्यांचें साम्राज्य बुडून उपऱ्या परधर्मी इंग्रजांचें राज्य या देशांत सुरू झाल्यामुळें धार्मिक, सामाजिक, आर्थिक–सर्वच मूळच्या घटना मोडकळीस आल्या व म्हणून त्यांचे जागीं नवीन घटना घडविण्याची देशांत सर्वत्र ओरड सुरू झाली व चालू आहे. धार्मिक, सामाजिक नीतिबंधनें उपऱ्या परधर्मी सत्तेमुळें आर्थिक अव्यवस्था माजून ढिलीं झालीं आहेत. परकी परधर्मी सत्ता त्या बाबतींत स्वभावतःच उदासीन आहे. व देशी जन दारिद्र्यानें गांजल्यामुळें दंडाच्या किंवा शासनाच्या अभावीं धार्मिक, सामा-

जिक नीतिबंधनाचे बाबतींत मोकाट वावरूं लागला आहे.
'कालो वा कारणं राज्ञो राजा वा कालकारणम्।
इति ते संशयो माऽभूत् राजा कालस्य कारणम् ॥'
या दृष्टीनें या भारतभूमींतील विचारवंतांचे प्रयत्न ही सर्व विपरीत स्थिति दूर करण्याकरितां उपरी, परधर्मी, परकी म्हणून बहुदोषी राजसत्ताच बदलून टाकण्याकडे नेटानें चालू आहेत. या राजकारणांतील विचारवंतांच्या प्रयत्नांच्या बुडाशीं वहात असलेल्या विचारप्रवाहाकडे नजर लाविल्यास त्यांत आतां आतां नुकताच जडवाद-मूलक जो साम्यवाद थोडा प्रतिबिंबित झाला आहे तो सोडून दिल्यास प्रामुख्यानें अध्यात्मदृष्टीचाच विचार-प्रवाह दिसतो. पांचपन्नास वर्षांच्या येथील राजकारणां-तील विचारवंतांच्या विचाराकडे पाहिल्यास हेंच नजरेस येतें. लो. टिळकांची भूमिका त्यांनीं कारावासांत लिहिलेल्या गीतारहस्यावरून स्पष्ट होत आहे. त्यांचेनंतर महात्मा गांधींचे विचार देशांत देशस्वातंत्र्यार्थ पुढें आले त्यांच्या शांतिसत्याग्रहाच्या मार्गांत मनुष्याच्या

अंतिक व अंतिम हिताचा विचार स्पष्ट दिसतो व अद्यापि तेंच धोरण प्रचलित आहे. लो टिळकांनंतर महाराष्ट्रास अद्वितीयत्वानें भूषणभूत होणारे से. बापट हे होत. से. बापटांचे राजकीय बाबतींतील मार्ग महाराष्ट्रीयांस परिचितच आहेत. म. गांधी व से. बापट या दोन्ही विभूतींमध्यें अध्यात्म जरी सामान्य असलें तरी स्वातंत्र्य-मार्गांत शांतिसत्याग्रहाप्रमाणेंच शुद्ध सत्याग्रहावरही से. बापटांचा कायम विश्वास आहे हा फरक आहे. आमच्या हिंदुस्थानांतील॰ आर्यांच्या भूतकालाकडे पाहिल्यास भूपृष्ठाप्रमाणेंच वर म्हणजे मानवी समाजाच्या अध्यात्म-जीवनरूप ध्येयावर लक्ष ठेविल्यानें आमचा प्राचीन धार्मिक इतिहास उज्ज्वल दिसतो व आजही स्फूर्तिदायक ठरतो. श्रीमद्भगवद्गीतेंत अर्जुनास जो उपदेश केला आहे तो अभ्युदय-निःश्रेयसहेतुमूलक धर्माचा असल्या-मुळें या आपल्या प्राचीन पूज्य अमोल ग्रंथरत्नाकडे आद्य शंकराचार्यांपासून तों तहत आजपर्यंत भारतांतील विचारवंतांचें लक्ष वेधून राहिलें आहे. लो. टिळकां-

प्रमाणेंच म. गांधींनींहि गीतेचीच कांस धरली आहे व आपणांस प्रतीत झालेला अर्थ त्यांनीं आपल्या अनासक्तियोग नांवाच्या गीतेवरील टीकेंत व्यक्त केला आहे. से. बापटांचा तर श्रीहरीवरील विश्वास महाराष्ट्रास मुळशीच्या रणापासून ठाऊकच झाला आहे. भगवद्गीतेसंबंधीं त्यांचे विचार पहिल्या भागांत 'अभंगगीता' व 'गीताधर्म व सत्याग्रह' प्रकरणांत व्यक्त झाले आहेत. परंतु ते त्रोटक स्वरूपांत आहेत. पुढें महात्मा गांधींची अनासक्तियोग-टीका त्यांच्या अवलोकनांत आल्यावर ती न पटल्यामुळें त्यांनीं आपले गीतेवरील विचार त्याहून विस्तृत रूपानें 'गीताहृदय' व 'अनासक्तियोग-परीक्षण' या प्रकरणांतून मांडले आहेत. या दोन प्रकरणांपैकीं अनासक्तियोग-प्रकरणांत म. गांधींच्या गीतामताचें खंडन आहे व स्वतःच्या शुद्ध सत्याग्रहतत्त्वाचें मंडन आहे तें गीतातात्पर्यमीमांसकांनीं जरूर अवलोकावें. त्याप्रमाणें सेनापति बापटांची प्राणयज्ञाची कल्पना १९३१ पासून महाराष्ट्रीयांसमोर आली आहे व

आजही भारतासमोर ती त्यांनीं मांडली आहे. त्या कल्पनेचें स्वरूप ज्यांस पाहावयाचें असेल त्या जिज्ञासूंनीं गीता-हृदयांतर्गत आत्मसंहारसंहिता हें पोटप्रकरण पाहावें. कालप्रसंगानुसार नवें नवें स्फुरण देणाऱ्या या भगवद्गीतेच्या तेजाचे आत्मसंहारसंहिता पोटप्रकरणांत नवीन किरण पडलेले गीतेच्या अभ्यासकांस दिसतील. अर्थात् शांतिसत्याग्रहाचें तत्त्व आणि त्याची व्यवहारांतील अंतिम सीमा हीं नजरेस येतील. सध्याच्या देशाच्या निःशस्त्र स्थितींत, त्यांतून सर्व-शस्त्रसज्ज अशा उपऱ्या परकीय शत्रूच्या अंमलांत राजकारणांत पडलेल्या येथील विचारवंतांचें लक्ष **'अध्यात्मविद्या विद्यानां'** आणि **'मम वर्त्मानुवर्तन्ते मनुष्याः पार्थ सर्वशः'** असें सकल मानवांस अधि-कारयुक्त गंभीर वाणीनें उपदेशिणाऱ्या श्रीमद्भगवद्गीतेनें खेंचलें आहे. यावरून या आर्यांच्या प्राचीन श्रेष्ठ एक-मेव प्रमाण असलेल्या धर्मग्रंथांतील मानवी जीवनासंबं-धींचे विचार किती उदात्त, अचल, अमोल, व्यापक,

मराठी ग्रंथ संग्रहालय

प्रखर, तेजस्वी व अमर आहेत ह्याची साक्ष पटते. धर्मानें, वेदान्तानें, अध्यात्मानें आम्हांस बुडविलें असा भ्रम झालेल्या साम्यवाद्यांनीं या पांचपन्नास वर्षांच्या राजकीय इतिहासाकडे नजर दिल्यास त्यांची अध्यात्मवादाविषयीं झालेली गैरसमजूत दूर होईल. कितीही अनुकूल संधि आली तरी अंतःकरण कमकुवत असल्यास किंवा ताळ्यावर नसल्यास त्या संधीचा कांहींच उपयोग होऊं शकत नाहीं; पण अध्यात्ममूलक पराकाष्ठेच्या त्यागानें या पंचवीस वर्षांत किती फरक पडला आहे हें पाहिल्यास अध्यात्माबद्दलचा भ्रम दूर होईल. आम्हांस अध्यात्मानें बुडविलें नसून आमच्या अध्यात्मविरोधी कर्मशून्यतेनें बुडविलें आहे हें मागें वळून दोन शतकांकडे पाहिल्यास स्पष्ट दिसेल.

प्रयोगस्थित रशियांतील जडवादी साम्यवाद येथें जशाचा तसा पचणें शक्य दिसत नाहीं. अध्यात्मांतील समता व साम्यवादांतील समता यांत महदंतर आहे. एक ईश्वरावर अधिष्ठित तर दुसरी अनीश्वरवादी. एक अति-

व्यापक तर दुसरी अगदीं मर्यादित स्वरूपाची. अध्यात्मवादाचा व साम्यवादाचा येथें कालेंकरून समन्वय घडल्यास घडेल, घडावा असें वाटतें. से बापटांना नास्तिकता सोडल्यास साम्यवादांतील कांहीं भाग आजमितीसही मान्य असून तत्त्वतः साम्यवादराज्यपद्धति पसंत आहे असें व्याख्यानांतून त्यांनीं जे वेळोवेळीं विचार प्रदर्शित केले त्यांवरून व साम्यवादावर त्यांचें पद्य-वाङ्मयही आहे त्यावरून दिसत आहे. तें साम्यवादविषयक वाङ्मय या नंतरचा जो तिसरा भाग **यशोधन-राग-रंग** प्रसिद्ध होईल त्यांतच येणार आहे. अस्तु.—

शुभं भवतु !

१-१-३८. संग्राहक—धुंडिराज विष्णु देव.

# अनुक्रमणिका

प्रस्तावना—पृष्ठें १ ते १०

श्रीगीताहृदय—पृष्ठें १ ते ६८


| विषय | ओव्या |
|---|---|
| १ मतिभिन्नता ... ... ... | १-१२ |
| २ पांच पदार्थ ... ... ... | १३-२७ |
| ३ गीता-परिभाषा... ... ... | २८-३२ |
| ४ ब्रह्म सविलास, अविलास ... ... | ३३-४४ |
| ५ परिभाषा मोकाट ... ... | ४५-५१ |
| ६ ईश्वराचें व जीवाचें साक्षित्व, कर्तृत्व, भोक्तृत्व | ५२-७७ |
| ७ गीता शाश्वतधर्मग्रंथ ... ... | ७८-८५ |
| ८ शाश्वतधर्माचें आद्यतत्व ... ... | ८६-९० |
| ९ श्रीकृष्ण कठोर, कपटी, खोटा ... | ९१-१३० |
| १० खोट्याचा वगैरे हिशेब ... ... | १३१-१४१ |
| ११ पार्थाचें रडणें व लढणें ... ... | १४२-१६० |
| १२ शाश्वत धर्माचीं प्रधान अंगें .... | १६१-१७० |
| १३ आत्मसंहारसंहिता ... ... | १७१-२३३ |
| १४ मरणाचें अमरणत्व ... ... | २३४-२५२ |

१५ स्वधर्म ... ... ... २५३-२८८
१६ पार्थाची मुमुक्षुता ... ... २८९-३०६
१७ वैदिकनिंदा ... ... ... ३०७-३१३
१८ कर्मसंन्यास व फलसंन्यास ... ३१४-३३८
१९ जीवविकास ... .... ... ३३९-३५०
२० स्वकर्मणा अभ्यर्चन ... ... ३५१-३६०
२१ भक्तीविणें निर्वाण नाहीं ... ... ३६१-३६४
२२ मुक्त पुनरावृत्ति ... .. ३६५-३९८
२३ ज्ञानादि अंगें समान .... ... ३९९-४०५
२४ गीताहृदय ... ... ... ४०६ ४१८
२५ श्रीशंकराचार्य व श्रीलोकमान्य ... ४१९-४२२
२६ ज्ञानादि अंगें समान कां ? ... ४२३-४४२
२७ आत्मश्रद्धा ... ... ... ४४३-४५३
२८ समर्पण ... ... ... ४५४-४५६
अनासक्तियोग-परीक्षण – पृष्ठें ६९ ते ८६
परिशिष्ट—पृष्ठें १ ते ७

सेनापति पां. म. बापट



विरक्ती, धृति, स्फूर्ति अध्यात्म-तेज ।
स्फुरे अंतरीं; जो करी राष्ट्र-काज ॥
धडा देतसे आचरोनी जनांस ।
महाराष्ट्रीचा हा नवा रामदास ॥१॥

धुंडिराज देव

# श्रीगीता-हृदय

॥ ॐ तत्सत् ब्रह्मणे नमः ॥
॥ ॐ श्रीजगद्गुरवे श्रीकृष्णाय नमः ॥

कोणी संन्यास अ-संन्यास कोणी । अहिंसात्मक अनासक्ति कोणी । गीताहृदय म्हणोनी वानी । हें न मानी माझी मति ॥ १ ॥ ती म्हणे देहमायाभंग । सर्वेशसंग सर्वभूत-हितसंग । आणि लोकसंग्रह अथांग । ऐसें चतुरंग गीताहृदय ॥ २ ॥ गीता व्यष्टि-मोक्षशास्त्र । गीता समष्टि-मोक्षशास्त्र । गीता अध्यात्म-पुष्टिशास्त्र । गीताशास्त्र बहु-अंगी ॥ ३ ॥ गीता व्यष्टि-

मोक्षपर । मानिती श्रीआचार्य शंकर । गीता समष्टि-मोक्षपर । मज सार ऐसें दिसे ॥ ४ ॥ गीता अध्यात्म-निष्ठ नीतिपर । मानिती श्री-लोकमान्यवर । गीता नीतिनिष्ठ अध्यात्मपर । मज सार ऐसें दिसें ॥ ५ ॥ गीतार्थ अहिंसात्मक अनासक्ति । श्री-महात्मा गांधी मानिती । अनासक्त खल-हिंसा गीतार्थीं । माझी मति मज दाखवी ॥ ६ ॥ व्यष्टिमोक्ष अ-पुनरावृत्ति । प्रधान गीतार्थ कोणी मानिती । समष्ट्यर्थ मुक्त-पुनरावृत्ति । मज गीतार्थीं प्रधान दिसे । ॥ ७ ॥ व्यष्टिमोक्षा ज्ञान, भक्ति । ध्यान, संयम वा कर्मशक्ति । प्रधान अंग गीता-मतीं । अन्यान्य-मति ऐसी असे ॥ ८ ॥ ज्ञानादि अंगें तुल्यबल । श्रद्धा-समुच्चित निर्मल । व्यष्टीस देती मोक्षफळ । गीतार्थ सरल मज दिसे ॥ ९ ॥ जन्मजात जातिधर्म । कुणी मानिती गीता-मर्म । संस्कारपूत स्वभावज धर्म । गीतामर्म मज दिसे ॥ १० ॥ गुरु-वाक्यश्रद्धा शास्त्रश्रद्धा ॥ कुणा गीतेची श्रेष्ठ श्रद्धा । गीतामतीं श्रेष्ठ श्रद्धा आत्मश्रद्धा मज दिसे ॥ ११ ॥ सांख्यमत निरीश्वर । त्याचा गीता न करी अव्हेर ।

ईश्वरवादी वैदिक[१] थोर। त्यांचा अव्हेर गीता करी ॥१२॥ ती सांख्यां म्हणे तत्त्वज्ञान । तुमचें मज बहुधा प्रमाण । परी तुमचें धर्माधर्म-निदान । थोडें अपूर्ण दिसे मज ॥ १३ ॥ तुमचा आत्मा केवळ साक्षी । प्रकृति-क्रिया-विक्रिया लक्षी। धर्म-अधर्म तुमच्या पक्षीं । प्रकृति-कुक्षीं खेळ सारा ॥१४॥ प्रकृतीचा खेळ अडोळस। तुमचा आत्मा केवळ डोळस । या मतांत विवेकाचा आळस । विवेकियांस दिसावा ॥ १५ ॥ पिंडीं डोळस अ-डोळस । तत्त्वें दिसती तुम्हांस । तशी अनलस विवेकास । ब्रह्मांडीं खास दिसावीं ॥१६॥ ब्रह्मांड डोळस अ-डोळस । पिंड तयाचा तत्सम अंश । या मता विवेक-प्रकाश । विवेकियांस दिसावा ॥ १७ ॥

---

१ वैदिक=वेदवादी=ज्ञानहीन कर्मवादी. गीताकालीं वेद या शब्दामध्यें हल्लींप्रमाणें मंत्र, ब्राह्मण, उपनिषद्, वेदान्त या सर्वांचा समावेश होत नसे. त्या वेळीं वेद शब्दानें यज्ञादि-संबंधीं विधिनिषेधपर मंत्र–तेवढा मंत्रभाग–एवढाच अर्थ सूचित होत असे. ब्राह्मण, उपनिषद्, वेदान्त यांसाठीं ते ते शब्द निरनिराळे वापरावे लागत.

पिंड ब्रह्मांडाच्या पोटीं । पिंडींची क्रिया-विक्रिया-रहाटी । दोन डोळसांची खटपटी । विवेक-पोटीं दिसावी ॥ १८ ॥ ब्रह्मांडीं तत्त्व डोळस । त्याचे अनंत अंश डोळस । लेऊनी अ-डोळस देहास । संसारास लागती ॥ १९ ॥ ब्रह्मांडीं तत्त्व डोळस । साक्षी चालक ब्रह्मांडास । धर्म-अधर्म-विकास । तयाचा विलास संसारीं ॥ २० ॥ ब्रह्मांड अ-डोळस प्रकृति । ब्रह्मांड डोळस प्रकृतिपति । प्रकृतीची कृति-विकृति । सर्वां तत्पति निमित्त असे ॥ २१ ॥ प्रकृति आणि प्रकृति-पति । एका तत्त्वाची विलास-स्थिति । विलास तों तत्साक्षित्व-स्थिति । अविलास-स्थिति अनिर्वाच्य ॥२२॥ ब्रह्मांड अनिर्वाच्या पोटीं । पिंड ब्रह्मांडाच्या पोटीं । पांच पदार्थांची गांठी । पिंडासाठीं जाहली असे ॥२३॥ एक प्रकृति अ-डोळस । दुजा जीव डोळस । तिसरा ईश्वर डोळस । साक्षी सविलास चौथा तो ॥ २४ ॥ पांचवा अ-विलास अ-द्वितीय । खरा एकला एक अव्यय । त्याचे पोटीं होय जाय । आय-व्यय इतरांचा ॥२५॥ दोन डोळसांची खटपटी । स्पष्ट दिसे पिंडा-

स्थळ प्रत

पोटीं । जीवेश्वरांची झटापटी । विलासासाठीं चालली असे ॥ २६ ॥ जीव असंख्यात अनीश्वर । ईश्वराचे अंशावतार । अडोळस प्रकृतीचे विकार । देहाकार तयां होती ॥ २७ ॥

साक्षी अनिर्वाच्य तें ब्रह्म परम अक्षर । अध्यात्म[1] स्वभाव प्रकृति परापर । पर प्रकृति तो चालक ईश्वर । प्रकृति अपर त्रिगुणखाणी ॥ २८ ॥ कर्म[1] विसर्ग भूतभावोद्भवकर । तें अपर प्रकृतीचा विकार । तत्कर्ता कुलाल ईश्वर । प्रकृति अपर मृत्तिका त्याची ॥ २९ ॥ अधिभूत[2] अपर-प्रकृति-विस्तार । अधिदैवत जीव देहधर । अधियज्ञ साक्षी ईश्वर । जीव सुहृद्वर यज्ञभोक्ता ॥ ३० ॥ क्षेत्र[3] तें अधिभूत । क्षेत्रज्ञ अधिदैवत । ज्ञेय[4] ईश्वर साक्षी अद्वैत । तत्प्राप्ति करवीत तें ज्ञान[5] ॥ ३१ ॥ क्षेत्र तोचि पुरुष[6] क्षर । क्षेत्रज्ञ पुरुष अक्षर । पुरुषोत्तम

---

१ गी. अ. ८, श्लो. ३,४. २ गी. अ. ८, श्लो. ३,४. ३ गी. अ. १३. श्लो. ५,६. ४ गी. अ. १३, श्लो. १२ ते १७. ५ गी. अ. १३, श्लो. ७ ते ११. ६ गी. अ. १५, श्लो. १६, १७.

साक्षी ईश्वर । त्रैलोक्याधार अनिर्वाच्य ॥ ३२ ॥

ब्रह्म सविलास असतांहि अविलास। हें नीट ध्यानीं यावयास । पहावें आपण आपणांस । विवेकाची कांस धरावी क्षण ॥ ३३ ॥ माझें कथन तुमचें श्रवण । आपुलें या क्षणीं सविलासपण । परी आपुलें शक्तिनिधान । सर्व झाडून यांत नाहीं ॥ ३४ ॥ तैशीच गोष्टी ब्रह्माची । ही सृष्टि एक लीला त्याची । हींत त्याच्या शक्तिसर्वस्वाची । न होय साची समावणी ॥ ३५ ॥ तें शक्तिसर्वस्व ब्रह्माचें । कसें कोणी वर्णायाचें । अ-चिंत्य तें अ-विषय वाचेचें । म्हणोनी साचें अनिर्वाच्य ॥ ३६ ॥ अ-निर्वाच्य अविलास ब्रह्म । तेथ सृष्टिव्यापाचा उपक्रम । कैसा कां याचें काय काम । त्या अकाम अनिर्वाच्या ॥ ३७ ॥ हा सृष्टिव्यापविलास । त्याचा स्वानंद-समुल्लास । स्वानंदीं नाचतां नाचणारास । नाचतोसी कशास पुसोनी काई ॥ ३८ ॥ ब्रह्म एकलें स्वसाक्षिक अव्यय । तें विलाससाक्षी विलासमय । विलास जगत्-जीवेश्वरत्व-आय-व्यय । नाट्य मायामय स्वानंदमूल ॥ ३९ ॥ माया ब्रह्माची

नाव्यशक्ति । अव्यक्त त्या परम अव्यक्तीं । परा आणि अपरा प्रकृति । तियेची स्थिति द्वैतरूप ॥ ४० ॥ परा प्रकृति चिन्मय ईश्वरतत्त्व । अपरा जगताचें जड मूलतत्त्व । तत्त्वें तम रज आणि सत्त्व । याचें समत्व अपरे ठायीं ॥ ४१ ॥ अपरेचा विकार-विस्तार । सूक्ष्म-स्थूल-भूताकार । इंद्रियें मन बुद्धि अहंकार । आणि संभार इंद्रियार्थांचा ॥ ४२ ॥ अपरा तें महत् ब्रह्म । तद्विकारांवरी कुलालत्व-श्रम । करूनी अनंत क्षेत्रें मनोरम । ईश्वर अपर-ब्रह्म निर्माण करी ॥ ४३ ॥ त्या अनंत क्षेत्रीं क्षेत्रज्ञ होय । क्षेत्रनिर्माता ईश्वर चिन्मय । उपद्रष्टादि[१] रूपें करी साहाय्य । त्यासी निरामय करावया ॥ ४४ ॥

अनिर्वाच्य साक्षी ईश्वर । अभिन्नरूप एकाकार । तेंचि ब्रह्म परम अक्षर । ऐसा विचार कोणाचा असे ॥४५॥ या पक्षीं अध्यात्म स्वभाव । अपर प्रकृति आणि जीव । पर प्रकृति वा स्वभाव । जीवासि नांव या पक्षीं ॥४६॥ अथवा अध्यात्म स्वभाव । जीवाचा मूळ सच्चिदानंद

---

१ गी. अ. १३, श्लो. २२.

भाव । जो मिळवुनी देण्या उपाव । उठाठेव अध्यात्मशास्त्राची ॥४७॥ अथवा अध्यात्म स्वभाव । ब्रह्माचा सच्चिदानंदभाव । ज्यासंगें व्हाया सायुज्यभाव । उठाठेव अध्यात्मशास्त्राची ॥४८॥ आत्मा हें मोकाट नांव । अनिर्वाच्यादि देहांत त्याचा गांव । या गांवीं कोठेंहि यासी वाव । यासी मज्जाव नाहीं कोठें ॥४९॥ देह आत्मा इंद्रियें आत्मा । मन आत्मा बुद्धि आत्मा । जीव आत्मा ईश्वर आत्मा । साक्षी आत्मा आत्मा अनिर्वाच्य ॥५०॥ अध्यात्म स्वभाव प्रकृति । या शब्दाची ऐशीच स्थिति । पाहावी पूर्व-अपर ग्रंथगति । हो मुख्य रीति बोध व्हावया ॥५१॥

असो तुमच्या सांख्य मतीं । पुरुष आणि प्रकृति । ही जगताची मूल स्थिति । तेथुनी उत्पत्ति सृष्टिबाजाराची ॥५२॥ मी हें मानीं परी पुरुष । असंख्य हा तुमचा विशेष । प्रकृति एक, एक पुरुष । ऐसा पक्ष माझा असे ॥५३॥ पुरुष चिन्मय प्रकृति जड । हें तुमचें तत्त्व जाड । पुरुषसाक्षित्वें प्रकृतिवाढ । हेंहि गोड तुमचें कथन ॥५४॥ परी साक्षित्वापोटीं चाल-

कत्व । अकर्तृत्वापोटीं कर्तृत्व । कर्तृत्वापोटीं भोक्तृत्व । हें सत्य तत्त्व मज दिसे ॥५५॥ प्रकृतीचे सृष्टि प्रसवणें । तें मृत्तिकेचें घटरूप होणें । येथें साक्षित्वासह हात चालविणें । बुद्धि चालविणें कुलाला पडे ॥५६॥ घटीं उपयोगित्व मनोरमत्व । अथवा साधुत्व सुंदरत्व । ऐसें दुहेरी कर्तृत्व । हें कुलालत्व सत्कुलालाचें ॥५७॥ या दुहेरी कर्तृत्वाच्या पोटीं । आनंदाची उर्मि गोमटी । उठे सत्कुलालाच्या पोटीं । ऐसी रहाटी प्रत्यक्ष असे ॥५८॥ प्रकृति एक, एक पुरुष । पुरुष सत्कुलालविशेष । प्रकृति सूक्ष्म मृत्तिकाविशेष । ऐसा पक्ष माझा असे ॥५९॥ चिन्मयाकाशत्व पुरुषस्थिति । जडाकाशविशेष प्रकृति । प्रकृतीपासोनी विकारोत्पत्ति । ती आद्य कृति पुरुषाची ॥ ६० ॥ प्रकृति-विकाराचे विकार । घडूनी देह नानाकार । घेऊनी तयांचा आधार । अनंताकार पुरुष होय ॥६१॥ एक पुरुष ईश्वर । अनंत पुरुष अनीश्वर । ईश्वराचे अंशावतार । त्याचे सहचर सृष्टिखेळीं ॥६२॥ तयांसी साक्षित्व कर्तृत्व भोक्तृत्व । अंशरूप ईश्वरत्व । अंशरूप सत्कुलालत्व ।

ऐसें तत्त्व सृष्टिखेळाचें ॥ ६३ ॥ ईश्वर आणि प्रकृति । ही जगताची मूल स्थिति । प्रकृतितंत्र ईश्वरकृति । ईश्वरमति प्रकृतिचालक ॥६४॥ ही जी अन्योन्य-तंत्रता । येणें सदोष ईश्वरता । ही जडतंत्र ईश्वरता । मूल ईश्वरता न दिसे मज ॥ ६५ ॥ जगन्मूलद्वयाचें मूल । पूर्ण स्वतंत्र तत्त्व केवल । परमेश्वर परमात्मा अनंतबल । हें ज्ञान विमल मज दिसे ॥ ६६ ॥ त्या केवल परम अव्यक्तीं । असे सुप्त मायाशक्ति । तियेची विलासार्थ जागृति । ईश्वर-प्रकृति हें द्वैत ॥ ६७ ॥ अद्वैत केवल तें पर-ब्रह्म । ईश्वर प्रकृतिचालक अपर-ब्रह्म । प्रकृति ईश्वरतंत्र महत्-ब्रह्म । ऐसा ब्रह्मीं ब्रह्म-पसारा ॥ ६८ ॥ अपर-ब्रह्म ती परा प्रकृति । महत्-ब्रह्म ती अ-परा प्रकृति । ह्या ब्रह्मद्वयाची विवाहस्थिति[१] । करी उत्पत्ति सांख्य-पुरुषांची ॥ ६९ ॥ ईश्वर प्रकृतीचा ईश्वर । तयाचा ईश्वर परमेश्वर । त्रिलोकरचना[२]-रक्षण-संहार । ईश्वर-व्यापार परमेश्व-

---

१ मम योनिर्महत् ब्रह्म... २ (१) प्रकृतिं स्वामवष्टभ्य... अ. ९, श्लो ७; (२) परित्राणाय साधूनां अ. ३, श्लो. ८;

नोंद नं. ८८८५
स्थळ प्रत
सं. ३१०९ ता. ११६०


रार्थ ॥ ७० ॥ परमेश्वरीं शुद्ध साक्षित्व । ईश्वरीं कर्तृत्वयुक्त[१] साक्षित्व । प्रकृतींत ईश्वरतंत्र विकारित्व । हें व्यवस्थातत्त्व केवल विलासाचें ॥ ७१ ॥ परमेश्वर व्यापक ईश्वर व्यापक । जीव व्यापक प्रकृति व्यापक । बुद्धि व्यापक मन व्यापक । व्यापक अ-व्यापक सापेक्ष विचार ॥ ७२ ॥ मन व्यापक इंद्रियांसी । बुद्धि व्यापक मनासी । जीव व्यापक बुद्धीसी । ईश्वर जीवासी व्यापक असे ॥७३॥ जीव व्यापक बुद्धि-मन-इंद्रियां । प्रकृतीही व्यापक असे तयां । या दोन व्यापकांच्या लढाया । ठायांठायां चालल्या असती ॥ ७४ ॥ हा लढा प्रकृतीचा जीवाचा । मार्ग जीवाच्या विकासाचा । येथें जीव जयी व्हावयाचा । हाचि अखेरचा प्रवेश खेळीं ॥७५॥ परमेश्वर[२] एकांतिक सुखाचें भांडार । त्याचें निवासस्थान ईश्वर । परमेश्वरा जीव पावणार ।

---

(३) कालोस्मि लोकक्षयकृत् अ. ११, श्लो. ३२; (४) उत्सीदेयुरिमे...अ. ३, श्लो. २४.

१ चातुर्वर्ण्यं मया सृष्टम्, न मां कर्माणि... इ.

२ ब्रह्मणोहि प्रतिष्ठाऽहं. .........सुखस्यैकांतिकस्य च.

हेंचि अखेर संसार-खेळाची ॥७६॥ परी हें न होय ईश्वरप्रसादाविणें । तो प्रसाद शाश्वत-धर्माचरणें । त्या शाश्वतधर्माचें ईश्वर ठाणें । जीवा ईश्वराविणें गति नाहीं ॥ ७७ ॥

हा शाश्वत-धर्म ईश्वरप्रतिष्ठित । कोणता हें कळावया निश्चित । ज्ञानविज्ञानें भरला ग्रंथ । जीवा समर्थ करावयासी ॥७८॥ ज्ञान तें ब्रह्मविद्या । विज्ञान तें ब्रह्मयोगविद्या । ही दुहेरी उपनिषद्[1]-विद्या । अनवद्या आद्या जगदुद्धारक ॥ ७९ ॥ प्रति अध्यायीं ज्ञानविज्ञान । थोडें थोडें मिसळून । पार्थाचें झाडिलें अज्ञान । समर्थ सज्ञान केलें तया ॥ ८० ॥ उपनिषदीं जें गोड सांपडे । तें इये ग्रंथीं ठायीं पडे । जें तेथें स्थूल दृष्टीसी दडे । तेंहि येथें सांपडे गोड कांहीं ॥ ८१ ॥ आपणां आपण न स्तवावें । म्हणुनी क्षमावे हे बोल आघवे । मजमध्यें गोड असेल तें घ्यावें । नीरस टाकावें नीरस म्हणुनी ॥ ८२ ॥ माझे पित्याची हेचि सांगणी[2] । ग्रंथाचे

---

१ श्रीमद्......उपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे...इ.

२ गी. अ. १८, श्लो. ६३.

समाप्ति-प्रकरणीं । ग्रंथ हा निःशेष विवर विवरूनी । पडेल पचनीं तेंचि सेवावें ॥ ८३ ॥ तो भारती युद्धाचा काल । तो पार्थ रणविमुख मोहाकुल । हें ईश्वरकृत निमित्त केवल । या विश्वमंगल ज्ञानसत्रासी ॥ ८४ ॥ हें ज्ञानसत्र शाश्वतधर्मग्रंथ । शाश्वत धर्म तो शाश्वत सुखपंथ । हें विश्व दुःखमय अनित्यसुखांत । तया नित्यसुखश्रीमंत करावया कथिला ॥ ८५ ॥

त्या शाश्वत धर्माचें आद्याद्य तत्त्व । ओळखणें मरणाचें अमरणत्व । हें बाणावया तत्त्व-असाधारणत्व । घोर-रण-शरणत्व या प्रवचनाचें ॥ ८६ ॥ वृथा मरणमारणभयें भेदरले । त्यांनीं अधर्म-आचरण आदरिलें । तें दुःखपात्रांत महादुःख ओगरिलें । जाणुनि अवतरले तात माझे ॥ ८७ ॥ देहाचें छेदन भेदन कंदन रणीं । ही कुणा आवडे संहारसरणी ? त्यांतून आप्तेष्ट-गुरुजन-हननीं । भयंकर करणी कोणा न दिसे ? ॥ ८८ ॥ आप्तेष्टां मारण्याहूनी बरें मरण । बरें संन्यासग्रहण । बरें भिक्षापात्र-अवलंबन । बरें सहन अवमानाचें ॥ ८९ ॥ हें पार्थवचन माने सुजनांस ।

परी तें न मानलें माझ्या पितयास । तेणें हंसत हंसत पार्थास । स्वजनहननास उद्युक्त केलें ॥ ९० ॥

माझा पिता कोणी कपटी । तयें पुरवुनी पांडवांची पाठी । त्यांसी भल्या कौरवांशीं अटीतटी । लढवुनी चावटी थोर केली ॥ ९१ ॥ पुढें कालचक्राच्या फेऱ्यांत । माझा पिता बसला देव्हाऱ्यांत । ऐसें कोणी [1]प्राच्यविद्यानिष्णात । पांडित्य यथार्थ (!) करिताती ॥ ९२ ॥

---

१ मॅक्डोनेलकृत संस्कृत वाङ्मयाचा इतिहास (मराठी अनुवाद पृ. ३००, ३०१) "...यावरून असें गृहीत धरलें पाहिजे कीं अशीं तुटक युद्धांचीं गीतें एखाद्या प्रतिभाशाली कवीनें एकत्र जुळवून त्यांचें एक छोटेंसें पुराण करून त्यांत न्यायनिष्ठ आणि सद्गुणशील कुरुकुलाचा विजयी पांडुपुत्र व त्यांचा नायक कृष्ण यांच्या कपटानें नाश झाला त्या प्रसंगाचें वर्णन केलें असावें. .. कविपरंपरेनें चालत आलेल्या या महाभारताची वाढ वीस हजार श्लोकांवर झाली हें त्याचें दुसरें अवस्थांतर होय; व या अवस्थेंत विजयी पांडुपुत्रांच्या चरित्रास अनुकूल स्वरूप देण्यांत येऊन, शिव आणि विष्णु या दोन मोठ्या देवांस ब्रह्मदेवाच्या पदवीइतकी मोठी पदवी देण्यांत आली आणि कृष्णाला विष्णूचा अवतार हें स्वरूप मिळालें."

माझा पिता कोणी कवि । ऐसें कोणी[1] यथार्थ शिकवी । मनीषी[2] कवि पुराण[3] कवि । कवींचा[4] कवि तो प्रसिद्ध ॥ ९३ ॥ कठोर कपटी कवीश्वर । कोमल सरळ व्यवहारचतुर । म्हणूनीच माझ्या पितया ऋषीश्वर । पूर्णावतार म्हणताती ॥ ९४ ॥ त्रिगुणी प्रकृति आणि माझा तात । यांचें निजानंदीं न पाहतां गणगोत । परमेश्वरें उधळोनियां अक्षत । विवाहसंगत त्यां केलें ॥ ९५ ॥ त्या मंगल विवाहाची संतति । बालपणीं सर्वस्वीं मातेहातीं । शैशवीं यौवनीं आपुलाली मति । यथाशक्ति चालवूं लागे ॥ ९६ ॥ हीं अजर अमर दिव्य बाळें । यांचे नानाविध डोहाळे । पुरवुनी त्यांसी यथाकाळें । देणें आगळें ज्ञान-विज्ञान ॥ ९७ ॥ हें परमेश्वरनियत ईश्वरकार्य । हें नियतकार्य हो अव्यवहार्य । जरी ईश्वर मत्पिता आर्य । न वरी अनिवार्य कठोरता कपट ॥ ९८ ॥ निज बाळांच्या हितार्थ कपट । तयांच्या हितार्थ कठोरता

---

१ गीता एक महान् धर्मकाव्य आहे. अनासक्तियोग पा. २५. २ सापर्यगात्... कविर्मनीषी । ईशावास्य. ३ कविं पुराणमनुशासितारम्... गी. अ. ८, श्लो. ९. ४ गणानां त्वा गणपतिम्.

निपट । तयासाठींच कवित्वाची लटपट । तात प्रेम-लंपट करीतसे ॥ ९९ ॥ जें कोमलतेनें न घडे हित । तें घडवावया कठोरता विहित । जें सरलतेसी न आतुडत । तदर्थ विहित कपटकृति ॥ १०० ॥ तैसें जें व्यवहारचतुराई न साधी । तें साधावया लावी कवित्व-समाधि । तात्पर्य जीवांच्या हरावया आधिव्याधि । ताताचे विधि सर्वही असती ॥ १०१ ॥ कौरव भले पांडव भले । ताता सर्वचि आपुले । जया जें पाहिजे होतें तें दिलें । लढवुनी बलें दोघांचीं ॥ १०२ ॥ भला तो न भला चौरस । खल तो न खल चौरस । खलाई भलाई सरस नीरस । दाखवी जीवरस प्रति-जीवीं ॥ १०३ ॥ खलाई भलाई सापेक्ष नांवें । कठोरता कोमलता सापेक्ष नांवें । कपट सरलता सापेक्ष नांवें । तातासी व्हावें विश्वमोचन ॥ १०४ ॥ विश्वमोचना साहाय्यक । तें कर्म करवी विश्वनायक । भले आणि खल हें नाटक । केवळ तात्कालिक कार्यापुरतें ॥ १०५ ॥ तामस आळशी झोंपाळ । राजस अधाशी नाठाळ । कठोरतेचा कपटाचा खेळ । त्यांचा सत्त्वकाळ याव-

यासी ॥ १०६ ॥ सात्त्विक अहंकारें नासले । ते यथा-
काळ ईश्वरें फांसले । तेणें त्यांचें हृदय विकासलें । तेथें
प्रकाशलें गुणातीतत्व ॥ १०७ ॥ मातृ-आत्म-पितृ-भक्तता ।
प्रकृति-अहं-ईश्वर-शरणता । हा जीवाचा शिवसायुज्य-
पंथा । परमेश्वरी शिवसत्ता निश्चित करी ॥ १०८ ॥
परमेश्वरीं शुद्ध साक्षित्व । तें गांठियलें त्यां स्वयें तत्त्व ।
मजसी काय होय ईश्वर-शरणत्व । ऐसें सत्त्व
अहंकारी म्हणे ॥ १०९ ॥ अहंश्रद्धा जे कां सात्त्विक ।
तेचि आत्मश्रद्धा तात्त्विक । ऐशी वृत्ति अ-
तात्त्विक । अ-भाविक सत्त्वीं उठे ॥ ११० ॥ हें
सात्त्विक जीवाचें मी-ज्ञानीपण । हें तयाचें मी-सुखी-
पण । हें तयाचें मी-मीपण । जावया कठोरपण ईश्वर
धरी ॥ १११ ॥ जीव इंद्रिय-मन-बुद्धींचा आत्मा ।
ईश्वर जीवाचा आत्मा । परमेश्वर ईश्वराचा आत्मा ।
तो परमात्मा तुरीय शिव ॥ ११२ ॥ तुरीय देखे निज-
मायाविलास । पलीकडे तुरीयातीत अविलास । तेथेंचि
अनिर्वाच्य निजानंदास । शिव जीवास घेऊन जाई
॥ ११३ ॥ परी त्याच्या पागांत मोठी अडचण ।

जीवाचें सात्त्विक अहंपण । तें निपटावया मत्तात करुण । समुचित कठोरपण करीतसे ॥ ११४ ॥ कठोरता जीवाच्या विकासार्थ । तशी ती योजिणें पडे परीक्षार्थ । सात्त्विकां गुणातीतां एतदर्थ । महा अनर्थ भेटवी तात ॥ ११५ ॥ स्वपरीक्षणार्थ वा लोकसंग्रहार्थ । सात्त्विक गुणातीत नाना अनर्थ । तातापाशीं याचिती त्यांप्रीत्यर्थ । कठोर पुरुषार्थ तात योजी ॥ ११६ ॥ तात कठोर तैसा कपटी । कपटें कितेक नराधम निपटी । कपटें जरासंधादिकांची भेटी । मृत्यूशीं उठाउठी घडविली तातें ॥ ११७ ॥ कपटें मारविलें द्रोणाला । खोटें वदवुनी धर्माला । कपटें मारविलें जयद्रथाला । सुदर्शनें सूर्याला झांकुनीयां ॥११८॥ कपटें वरियलें रुक्मिणीला। कपटें सुभद्रा दिली अर्जुनाला । कपटें जगत्पटीं बहू खेळला । तयाच्या खेळाला सीमा नाहीं ॥ ११९ ॥ ताताचें कपट विश्व-प्रेम-मूलक । विश्वनाटकाचा तो एकटा चालक । असंख्य गुणी असंख्य जीवबालक । त्यांचा पालक एकटा तो ॥ १२० ॥ ही पालकत्वाची

स्थळ प्रत
सं. का०५न.

जबाबदारी। ही चालकत्वाची जबाबदारी। अल्पहि जयांच्या शिरावरी। तयां कपटाशिदोरी अवश्य लागे ॥ १२१ ॥ कपट खोटें कठोरता। सरलता सत्य कोमलता। सर्वांची घेऊनी सहायता। विश्वाच्या हिता संपादी तात ॥ १२२ ॥ मुख्यात्मकल्याण सर्वांचें। हें एकचि ध्येय तातांचें। हेंचि परम सत्य साचें। ऋषिवर्यांचें हेंचि कथन ॥ १२३ ॥ या परम सत्याच्या पोषणार्थ। कपट-आदिही सत्पुरुषार्थ। या सत्यासी पोंचवी अनर्थ। तो असत्पुरुषार्थ सरलता-दिही ॥१२४॥ या परम सत्याशीं सरल असावें। या परम सत्यासी सत्य असावें। या परम सत्यासी कोमल असावें। यासी न दुखवावें किंचित ॥ १२५ ॥ या सरलतेसाठीं कपट इतरांशीं। या सत्यासाठीं खोटें इतरांशीं। या कोमलतेसाठीं कठोरता इतरांशीं। माझ्या तातासी संमत असे ॥१२६॥ हें माझ्या तातांचें निश्चित मत। या मतें आपुल्या अवतारकार्यांत। तो वागला सर्वत्र सतत। तें तात-मत मुख्यात्महिताचें ॥१२७॥ तातें उपदेशिली उपनिषद्-विद्या। ती उप-

निषद्-विद्या अनवद्या । सरलतादि यमनियमविद्या । मानिते आद्या मुख्यात्मानुकूल[१] ॥ १२८ ॥ कुलार्थ[२] त्यजिणें एक एकमत । ग्रामार्थ त्यजिणें कुळ कुलमत । जनपदार्थ त्यजिणें ग्राम ग्राममत । पृथिवी पृथिवीमत मुख्यात्महितासाठीं ॥१२९॥ हें लोकप्रसिद्ध जुनाट वचन । तातासी हेंच वचन प्रमाण । जीव-मुख्यात्महितार्थ धर्मकारण । जन्मधारण[३] ताताचें ॥१३०॥

---

१ जाबालदर्शन—

**आर्जवम्**-पुत्रे मित्रे कलत्रे च रिपौ स्वात्मनि संततम् । एकरूपं मुने यत्तत् आर्जवं प्रोच्यते मया ।

**सत्यम्**—सर्वं सत्यं परं ब्रह्म न चान्यदिति या मतिः । तच्च सत्यं वरं प्रोक्तं वेदान्तज्ञानपारगैः ।

**अहिंसा**—आत्मा सर्वगतोऽच्छेद्यो न ग्राह्य इति या मतिः । सा च अहिंसा वरा प्रोक्ता मुने वेदान्तवेदिभिः ।

**दया**—स्वात्मवत्सर्वभूतेषु कायेन मनसा गिरा । अनुज्ञा या दया सैव प्रोक्ता वेदान्त वेदिभिः ।

२ त्यजेदेकं कुलस्यार्थे ग्रामस्यार्थे कुलं त्यजेत् ।
ग्रामं जनपदस्यार्थे आत्मार्थे पृथ्वीं त्यजेत् ।

३ धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ।

देहात्मवादाच्या लहरी । इंद्रियात्मवादाच्या लहरी । मन-बुद्धि-आत्मवादाच्या लहरी । लोकमतसागरीं उठत असती ॥ १३१ ॥ या लहरींनीं लहरावला । लोकमतप्रवाहीं वाहवला । तो मुख्यात्महितासी अंतरला । तेणें गरला अमृत मानिलें ॥ १३२ ॥ कपट कठोरता आणि खोटें । बोखटें मध्यम आणि चोखटें । हें जाणावें विवरूनी नेटें । नाना खेंगटें प्रकृतीचीं ॥ १३३ ॥ तामसाचें आळशी खोटें । राजसाचें अधाशी खोटें । सात्त्विकाचें परमार्थी[१] खोटें । विश्वहितार्थी खोटें गुणातीताचें ॥ १३४ ॥ हाचि हिशेब कठोरतेचा । हाचि हिशेब कपटाचा । कपटादि नांवें घाबरायाचा । विचार अविचाराचा टाकुनी द्यावा ॥ १३५ ॥ दृढ करावा सर्वात्मभाव । दृढ धरावा ईश्वरीं भाव । विश्वकल्याणाची हांव । निजस्वभाव करावा ॥ १३६ ॥ सर्वांचें वागणें पाहावें । सर्वांचें सांगणें ऐकावें । सर्वांचें लिहिणें वाचावें । सर्व विवरावें हृदयगुहेंत ॥ १३७ ॥ सर्वांतरीं जो वास करी । तो

---

१ व्यक्तीपुरती शांति, परम स्वार्थ.

राहतो तुमच्या हृदयविवरीं । त्याची संमति घेऊनी पुरी । कृति व्यवहारीं करावी ॥ १३८ ॥ 'अशो हें खोटें क्रौर्य कपट' । करोत कोणीही कितीही वटवट । तिची न होऊं द्यावी कटकट । अधियज्ञानिकट असावें स्थिर ॥ १३९ ॥ अधियज्ञ यज्ञभोक्ता तात । तुमची यज्ञार्थ कर्में पाहात । तुमच्या अंतरीं असे रहात । तयाचा हात बळकट धरावा ॥ १४० ॥ तो आंधळया जीवाची काठी । तो पांगळया घेतसे पाठी । तो भल्या दुबळ्यासाठीं । खलावरी लाठी चालवीतसे ॥ १४१ ॥

पार्थें केली रडारडी । हृदयीं स्वजनांची आवडी । डोळ्यांतुनी आंसवें काढी । धनुष्या पाडी हातांतुनी ॥ १४२ ॥ त्याचें श्रवूनी साश्रु-प्रवचन । साधु साधु म्हणती सामान्य सुजन । परी मत्तातें स्वजनहनन । पार्थहातून घडविलें ॥ १४३ ॥ पार्थ सात्त्विक परमार्थी । तात गुणातीत विश्वहितार्थी । तातें बोल बोलूनी नाना अर्थीं । साम्य-योग पार्थीं जागविला ॥ १४४ ॥ अवघें विश्व माझें घर । घर नोहे जीवांचें जिव्हार । त्याचा मुख्यात्म-उद्धार । हा एक व्यवहार माझा मोक्ष ॥ १४५ ॥

परी मी काय जाणें उद्धार-कथा। माझा सखा जाणे सत्पथा। तो सांगेल तें धरावें माथां। एवढें आतां कार्य माझें ॥ १४६ ॥ ऐसें पार्थ-हृदयें निश्चित केलें। मग तें निश्चयें उद्गारलें। अच्युता मोहसंदेह गेले। ठायावरी आलें चित्त माझें ॥ १४७ ॥ साम्ययोग जीवीं ठसला। सर्वात्मभाव जीवीं घुसला। आत्मस्मृति-लाभें आत्मा हंसला। आतां कसला खेद मातें ॥ १४८ ॥ तूं सांगूनियां बहु ज्ञान। बोलिलासी कीं तें विवर विवरून। मी करावें जें माझें मन। करी म्हणान सांगेन मज ॥ १४९ ॥ विवर विवरूनी माझ्या मनें। निश्चित केलें कीं त्वत्प्रसादानें। जागलेल्या माझ्या जीवानें। तुझें सांगणें करीत जावें ॥ १५० ॥ तरी अच्युता आतां तुझें वचन! करितों मी, होवो स्वजन-हनन। स्वजनसुखाहूनी विश्वकल्याण। श्रेष्ठ हें ज्ञान स्थिर झालें ॥ १५१ ॥ ऐसें बोलोनियां पार्थ। करी झुंज विश्वहितार्थ। मारूनी खल बहु समर्थ। जाला कृतार्थ कर्तव्य-वीर ॥ १५२ ॥ पार्थाचें साश्रु-प्रवचन। तेथें भेद स्वजन-परजन। तो गौण मानी विवेकी मन।

जया विश्वजन आपुले झाले ॥ १५३ ॥ जेथें कुटुंब जाले विश्वजन। कुटुंब नव्हे जीवींचें जीवन। तेथें स्वजन परजन । हा भेद दोन उरेना ॥ १५४ ॥ तेथें सुजन आणि दुर्जन। सौजन्य आणि दुष्टपण। हा भेद आत्मौपम्येन । सर्वत्र समदर्शन देखूं शकें ॥ १५५ ॥ तातबोधें पार्थें हें देखिलें । म्हणूनी तयें तातवचन राखिलें। रणाग्रही दुर्जनांहीं चाखिलें। रणरसीं माखिलें रोख मरण ॥ १५६ ॥ आप्तेष्टादि-द्रोह-पातकाची भीति। आप्तेष्टादि-संगसुखाची प्रीति। पार्थास शिकवीत होती नीति । रणसंगति सोडी बाबा ॥ १५७ ॥ विश्वजनद्रोह-पातकाची भीति। विश्वेशसंगसुखाची प्रीति । पार्थास शिकवूं निघाली नीति । रणसंगति न सोडी बाबा ॥ १५८ ॥ तातें भीतीस भीति सामोरी केली । तातें प्रीतीस प्रीति सामोरी केली। येणें रीतीं विलयासी नेली। पार्थवृत्ति हटेली[1] रणत्यागाची ॥ १५९ ॥ अशस्त्र राहूनी खलहस्तें मरणें । संन्यास घेणें भिक्षान्न खाणें । खलाहातीं

---

१ हटी.

अवमान साहणें । टाकिलें अर्जुनें लोकसंग्रहार्थ ॥ १६० ॥

सर्व भूतांचें मुख्यात्महित । सर्वात्मभाव गुणातीत । तत्प्राप्तिमार्गाकडे लोकांसी नेत । तें कर्मजात लोकसंग्रही ॥ १६१ ॥ स्वकर्तव्य भक्तीनें आचरणें । हें त्या मार्गाकडे असे जाणें ॥ तें करोनि आपुल्या उदाहरणें । लोकां आकर्षिणें हा लोकसंग्रह ॥ १६२ ॥ हा सर्वात्मभाव वा सर्वभूतहितसंग । हा लोकसंग्रह निर्दोष अव्यंग । पार्थासी शिकवी तात श्रीरंग । घोर रणप्रसंग निमित्त करोनी ॥ १६३ ॥ हीं शाश्वतधर्माचीं अंगें प्रधान । तीं सांग आचरावया मुख्य विधान । मरणाच्या असरणत्वाचें अनुसंधान । म्हणोनी रणमैदान प्रवचनपीठ ॥ १६४ ॥ मरण कोणाचेंही मरण नोहे । आत्मा हा देहावृत देहशरण नोहे । देहमरणें आत्ममरण नोहे । हें सत्य आहे श्रुत सर्वां ॥ १६५ ॥ सर्वां श्रुत परी सर्वां अश्रुत । ऐसे सर्वांचे व्यवहार चालत । देहाच्या मरणें अशरण होत । ऐसे विद्यावंत कितीतरी ॥ १६६ ॥ स्थूल प्रकृतीचा पसारा । स्थूल दृष्टीसी मोठा आसरा । येथूनी गेल्या पुढचा थारा । तियेच्या विचारा संदेह-

विषय ॥ १६७ ॥ मागें होतों पुढें होणार । अनेक देहांचा माझा व्यापार । आजवरी घडला पुढेंही घडणार । हा देह जाणार भला जावो ॥ १६८ ॥ ऐसा निश्चय स्थिर जयाचा । तो देहदुःखें न कांचा-याचा । तो लोकहितार्थ चालायाचा । मार्ग मरायाचा सुखें चाले ॥ १६९ ॥ जसें बाल्य तारुण्य वृद्धपण । तसेंच देहांतर-धारण । आत्म्या नाहीं मरण मारण । हा निश्चय तारण धर्माधर्मसंशयीं ॥ १७० ॥

खलसंहारें खलत्वसंहार । हा ताताचा एक विचार । खलत्वसंहारें खलसंहार । हाही विचार त्याचा असे ॥ १७१ ॥ खलमारण तुम्हांसी नावडे । न आवडो तातातें परवडे । खलत्वमारण तुम्हां आवडे । तदर्थ त्याकडे विचार घ्यावा ॥ १७२ ॥ खल आणि भला सापेक्ष नांवें । हें अनुभवें सर्वांसी असे ठावें । खळांतही ईश्वरत्व दिसावें । निज हृदय भावें भरलियावरी ॥१७३॥ करावया निज अवतारकार्य । खोटें कपट आणि क्रौर्य । तातें योजिलें परी तें अनिवार्य । अपरिहार्य तेव्हां होतें ॥ १७४ ॥ तात निधान विश्वप्रेमाचें । तात

निधान कोमलतेचें । सरलतेचें आणि सत्याचें । निधान साचें तात असे ॥ १७५ ॥ तुम्हां खलसंहार नावडे । खलमारणीं छाती धडधडे । खलमरणें कोसळे रडें । तातही रडे तुम्हांसवें तेव्हां ॥ १७६ ॥ खलत्व-संहार करावया । खल नको मारावया । आत्मसंहारें खलहृदया । सदय करावया झटावें ॥१७७॥ हा दुसरा तातविचार । करुण हृदयीं करी कठोर संचार । या विचाराचा सामुदायिक आचार । करण्याचा विचार करावा तुम्हीं ॥१७८॥ प्रकृतीची सनातन प्रयोगशाला । तेथ परमेश्वरें नेमियेलें ताताला । नाना प्रयोग करा-वयाला । त्रिगुणी मसाला घेऊनीयां ॥ १७९ ॥ त्या मसाल्याचे नाना प्रकार । त्या प्रकारांचे प्रति-प्रकार । घडूनी तात प्रयोगकार । सृष्टिकारभार चालवीतसे ॥१८०॥ जडाकाशांतुनी मानवापर्यंत । तातें भूतें घडिलीं अनंत । मानवप्रकारही असंख्यात । आला घडीत आजवरी ॥१८१॥ कुण्याही मानवी जिवाचा इतिहास । अति गहन विषय अभ्यासास । पुढें होणारा त्याचा विकास । मानव-मनास आकळेना ॥१८२॥ तो न

आकळे स्वयें तातास । तो ठावा एक परमेश्वरास । अथवा त्यासही स्वानंदफंदीं बेभानास । न ये ध्यानास अ-विकलपणें ॥ १८३ ॥ चला हें नाटक-संविधान रु । हे तुम्ही दास-दासी नायिका-नायक । स्वबुद्धीनें करा कांहीं कौतुक । तुम्हां मोकळीक दिधली मियां ॥ १८४ ॥ बहू नव्हे ही मोकळीक । बहू देतां बिघडेल नाटक । माझा नाराज होईल मालक । हें नाट्यकौतुक पाहाणारा ॥ १८५ ॥ ऐसें बोलो- नियां आपुल्या अंशांसी । तातें आरंभ केला नाटकासी । अंश ते अंश त्यांच्या अपूर्णत्वासी । सीमा कायसी असणार ॥ १८६ ॥ प्रयोगशाळेचे प्रयोगाचार्य । नाटकमंडळाचे नाटकाचार्य । माझे तात, त्यांतें निजकार्य । करितां अनिवार्य अडचणी येती ॥ १८७ ॥ नायक-नायिका निजपाठ विसरती । दास-दासींचें काम करिती । दास-दासी हुरळोनी वरिती । भूमिका पर ती नायक-नायिकांची ॥ १८८ ॥ ब्रह्मघोटाळा कर्मघोटाळा । भ्रमें भ्रम वाढे आगळा । नाट्यनियमांचा थोर बिंडाळा । देखती न डोळां पात्रें

मराठी ग्रंथ संग्रहालय स्थळ प्रत

कोणी ॥ १८९ ॥ ताताचें हृदय अति कोमळ । पाहूनी रंगभूमीचे हाल । तात न होय बेताल । दीर्घ काल शांति धरी ॥ १९० ॥ मग पात्रें अतीच बेढंग । रंगाचा करिती बहु बेरंग । त्यांसी पडद्याआड करूनी सोंग । आपुलालें सांग शिकवीतसे ॥ १९१ ॥ ही पडद्याआड करण्याची क्रिया । वेगळाली वेगळाल्या समया । प्रयोगाचार्या नाटकाचार्या । अनुभवें प्रक्रिया भिन्न सुचती ॥ १९२ ॥ खलसंहार न करावा । आत्मसंहारें खलत्वावरी धांवा । करूनियां खलीं कोमल भावा । जागवाया व्हावा प्रयत्नसंभार ॥ १९३ ॥ खलसंघार्थ सांघिक आत्मसंहार । करूनी खलसंघीं कोमलत्व-उद्धार । कराया करावा यत्न थोर । ऐसा प्रेमविचार तात शिकवी ॥ १९४ ॥ खलसंघाच्या खलत्वाचें मूळ । स्वसंघाचा संग स्नेह प्रबळ । या अतिसंगाचें प्रबळ मूळ । अतिध्यान केवळ स्वसंघसुखाचें ॥ १९५ ॥ या संगांतुनी काम निपजे । या अतिस्नेहांतुनी हांव उपजे । या हांवेनें खलसंघ सजे । लुटावया जें जें स्वसुख-साधन ॥ १९६ ॥ पुरवावया हा संघ-सुख-काम ॥ लावी

अन्य संघांसी लगाम । दाससंघाचे मोक्षादि काम । दुर्घट लगाम लागलीया ॥ १९७ ॥ हा लगाम ढिला खुला व्हावा । एतदर्थ दाससंघ करिती उठावा । तेणें खळसंघचित्तीं क्रोधाचा यावा । क्रोधें भरावा संमोहाचा ॥ १९८ ॥ या संमोहें गोंधळें वृत्ति व्यापिली । तेणें सत्-असत्-स्मृति भ्रंश पावली । त्या भ्रंशें खलसंघबुद्धि बुडाली । तेणें बुडवणूक झाली खलात्मयाची ॥ १९९ ॥ खलसंघासी क्रोध न यावा । म्हणूनी दाससंघें न करावा उठावा । अपहार प्रहार सर्व सोसावा । खलसंघ पोसावा आत्मत्यागें ॥ २०० ॥ खल-संघा क्रोध बहू न यावा । यास्तव दाससंघाचा उठावा । अशस्त्र अप्रतिकार असावा । चंग कसावा असहकाराचा ॥ २०१ ॥ खलसंघ खवळूं द्यावा । दासीं यथाशक्ति प्रतिकार करावा । शस्त्रास्त्राचा आश्रय द्यावा । मार्ग क्रमावा लाठपणें ॥ २०२ ॥ खलसंघा आत्मबलाचा पुरावा । आत्मसंहार करूनी प्रत्ययासी आणावा । दाससंघाचा आत्मोद्धारार्थ उठावा । त्यांत भाग व्हावा आत्मसंहाराचा ॥ २०३ ॥ ऐशीं मतमतां-

तरें जनीं वावरती । त्यांत प्रत्येकीं आहे सत्याची वसति । प्रकृतिभेदें संस्कृतिभेदें मति । या वा त्या मतीं श्रेष्ठत्व देखे ॥ २०४ ॥ आत्मसंहार सामुदायिक । शतीं सहस्रीं विमल भाविक । दाससंघाचा मोह दैहिक । दवडील मायिक उद्धारशत्रु ॥ २०५ ॥ दास-धनां मानी खलसंघ । देखोनी शता सहस्रांचा स्वकायभंग । आपुलें मदमत्त उत्तमांग । मदसुखीं दंग खाजवील ॥ २०६ ॥ अहो देवा दासहितचिंतका । खलां सुबुद्धि द्यावी खलांतका । या रक्तें खलाच्या खलत्वासी धक्का । लागूनी हो सखा आमुचा तो ॥ २०७ ॥ ऐशी भाविक याचना करूनी । शतीं सहस्रीं शिर द्यावें उतरुनी । या आत्मयज्ञें आपण तरूनी । जगदुद्धरणीं हात द्यावा ॥ २०८ ॥ खलीं चालविली दीन-दासहिंसा । ती असह्य होतां विहित खलहिंसा । परी समूळ हटवाया जनहिंसा । उपाय कायसा करावा ? ॥ २०९ ॥ समूळ जनहिंसा हटेल । हें आज विवेकियां न पटेल । परी आत्मसंहारमार्गें सुटेल ।

कांहीं घटेल[१] दीनहिंसा ॥ २१० ॥ अहिंसाधर्म धर्मांत उत्तम । ऐसें न बोलिला पुरुषोत्तम । खलहिंसेचें कार्य महत्तम । त्याचें श्रेष्ठतम अवतारकार्य ॥ २११ ॥ परी आपुल्या धर्म-प्रवचनीं । अहिंसा सांगितली फिर-फिरूनी । ज्ञान-तप-दैवीसपद् वर्णनीं । वरगुणगणनीं अहिंसा असे ॥ ११२ ॥ ज्ञान-तप दैवी-संपत्ति । ही मोक्षसाहाय्यक गुणसंतति । म्हणूनी अहिंसा मोक्ष-साहाय्यक ही मति । तर्कपद्धति मान्य करी ॥ २१३ ॥ खलहिंसा करी आणि करवी । तोचि अहिंसा मनीं भरवी । म्हणूनी खलहिंसा अहिंसात्मक हवि । हें तो शिकवी हें स्पष्ट असे ॥ २१४ ॥ माझे ठायीं चित्त जडवी । माझें मला ही हांव उडवी । मग अनासक्त चित्तें[२] खला बडवी । खलहिंसा-हवि समर्पी मज ॥ २१५ ॥ ऐसा पुरुषोत्तमें अर्जुना बोध केला । अनासक्त खलहिंसेचा धडा दिला । तथापि अहिंसा बहु आवडे तयाला । हें सहृदयाला सांगणें नलगे

१ उद्धट. २ मयि सर्वाणि कर्माणि संन्यस्याध्यात्मचेतसा । निराशीर्निर्ममो भूत्वा युध्यस्व विगतज्वरः ॥

॥ २१६ ॥ खलहिंसा खलात्मोद्धारक । खल-दलित-दुर्बलोद्धारक । म्हणूनी ती अपवादात्मक । हवि अहिंसात्मक गणियेली ॥ २१७ ॥ खलहिंसार्थ खोटें कपट । खलात्मोद्धार त्याचा शेवट । म्हणून तेंही अपवादात्मक अवीट । गणिलें चोखट सत्यार्जवात्मक ॥ २१८ ॥ जेणें आत्मोद्धार खलाचा खल-दलिताचा । तो मार्ग आवडता ताताचा । आत्मोद्धार चराचराचा । कार्यभाग त्याचा परमेश्वरनियत ॥ २१९ ॥ हा कार्यभाग मत्ताताचा । तो यथाशक्य तदंशाचा । तो करितां करितां जीवात्म्याचा । उद्धार साचा सुसाध्य होय ॥ २२० ॥ पार्था तूं यांसी मारीं । हे मीं मारिले संशय न धरीं । ऐसें बोलोनी पार्थासी उभारी । देत श्रीहरी खलहिंसेची ॥ २२१ ॥ हें विशिष्ट व्यक्तीस विशिष्ट सांगणें । दुसरें सर्व जनांसी सामान्य सांगणें । सत्कर्म करी जो निर्वैरपणें । त्याचें हो येणें मजकडे ॥२२२॥ हीं दोन्ही सांगणीं खलहिंसाविधायक । परी या जगन्नाटकाचा नायक । अहिंसाधर्माचा श्रेष्ठ गायक । अहिंसासाहाय्यक सर्वपरी ॥२२३॥ हिंसा

खळांची आवडती । भल्या कोमलांची नावडती । तिची जगांत पाहोनी चढती । सज्जन कढती मनींच्या मनीं ॥ २२४ ॥ नष्ट हांवो ही दुष्ट राक्षसी । ऐशी प्रार्थना सज्जनांची अहर्निशीं । अहिंसा संसारीं स्थापावयासी । कष्टती होसी अहिंसाप्रिय ॥ २२५ ॥ अगण्य हिंसायुगांतुनी शून्यहिंसायुग । एका टप्प्यानें न निघेल लगबग । मध्यें लागेल स्वहिंसायुग । ऐसा धर्मयोग दिसतसे ॥ २२६ ॥ सुधारलें जग सुसंस्कृत झालें । भोग-विलासीं चढाओढ चाले । विलासविकासार्थ संघयंत्र झाले । विनाश पावले दुर्बल संघ ॥ २२७ ॥ दुर्बल सात्त्विक खलसंहारीं । दुर्बल आंतसात्त्विक आत्मसंहारीं । केवल अर्धपक्ष असहकारी । तया संसारीं अधोगति ॥२२८॥ खलसंहाराची संहिता । घोकिली बहुकाल तातविहिता । आतां आत्मसंहाराची संहिता । तातसंमता घोकुनी पाहावी ॥ २२९ ॥ देवपूजन शारीर[1] तप । या तपीं आत्मसंहार-संकल्प । अंतर्भूत होय निष्पाप । हरावया जनताप जो केला

---

[1] गी. अ. १७, श्लो. १४.

॥ २३० ॥ देवदेवाचें सांघिक पूजन। करोनी करावें [1]स्वशीर्ष अर्पण। मागावें अहिंसाधर्म-संस्थापन । जेणें संसारजीवन स्वर्गीय होय ॥ २३१ ॥ हें सामुदायिक स्वशीर्षार्पण । जागवील खलहृदयीं कोमलपण । स्वजनींही देहमोहभंजन। चैतन्योत्थापन घडवील ॥ २३२ ॥ असो ही आत्मसंहार-संहिता । दिङ्मात्र निरूपिली तातसंमता । या निरूपणाची अपूर्णता । अहिंसा-करुणता पूर्ण करील ॥ २३३ ॥

---

१ × × ×

× × ×

अथवा केवल निजदेहाचा होम करा थोर ।
जगा दाखवा अद्भुत भारतसत्त्वाचा जोर ॥
या चला पांच शत तरी । भारतांतरीं । घेउनी सुरी ।
मी देतों पहिलें शिर । निज देशाच्या खातर ।
ईशाच्या चरणांवर ।
देश मिळेना देहमोह हा जोंवरी न आटे ।
तुम्हीं टाकुनी द्यावें आपुलें चरित्र उरफाटें ॥ ध्रु० ॥
—मुक्तिमार्गमीमांसा ( अप्रकाशित )

सर्वभूतहितीं अत्यंत आसक्ति । स्वार्थीं सर्वथा अनासक्ति । ईश्वरीं अपार निष्ठा प्रीति । ही जीवात्मस्थिति परम शांतीची ॥ २३४ ॥ ही स्थिति जीवमात्रास प्राप्त व्हावी । यासाठीं ताताची सर्व उठाठेवी । यासाठीं नाना अवतारीं आपणासी गोंवी । धर्मध्वज रोवी यासाठीं तो ॥ २३५ ॥ तेणें ध्वज शाश्वतधर्माचा । रणीं रोविला, या रोविण्याचा । हेतु, विचार मरणाचा । जीवा सदाचा सन्मित्र व्हावा ॥२३६ ॥ मरण वाटे अमित्र जोंवरी । आत्मोद्धार अशक्य तोंवरी । देह न टाकवे जीर्ण वस्त्रापरी । आत्मविचारीं टोणपा तो ॥ २३७ ॥ आत्मा हें चिन्मय आकाशतत्त्व । तेथें सर्वव्यापित्व आणि समत्व । अजत्व आणि अमरत्व । देहाचें नश्वरत्व तेथें नाहीं ॥ २३८ ॥ देह अतिस्थूल आत्मोपाधि । दुसऱ्या मनआदि सूक्ष्मतर उपाधि । त्यांच्या द्वारा आत्मा निरुपाधि । निज विकास साधी बहुरंगी ॥ २३९ ॥ हा त्याचा बहुरंगी विकास । साधणें ईश्वराचें साध्य खास । तेथें कांहीं स्वतंत्रता आत्मयास । कर्तव्य करण्यास दिधली असे ॥ २४० ॥ या बहुरंगी विकासाचें एक थोर साधन ।

त्याचें नांव देहांतर वा मरण। तें परम मित्र आनंद-कारण। त्यासी अ-कारण न निंदावें ॥ २४१ ॥ स्थूल लोक हा सृष्टिभाग एक। सृष्टींत कितीक सूक्ष्म लोक। तेथींचें विविध संसार-कौतुक। पाहावया हांक मरणाची ॥ २४२ ॥ मरण गूढ सृष्टींचें कवाड। जिज्ञासूंसी तें न वाटे दुवाड। काय काय दडलें त्याचे आड। तें जाणण्याची चाड बाळगावी ॥ २४३ ॥ जीवाचें जागरण स्वप्न। तैसें सुषुप्तींत त्याचें स्थान। याचें करूनी विवरण। निरंतर स्मरण ठेवावें ॥ २४४ ॥ जागरण स्थूल-सृष्टिविहार। स्वप्न सूक्ष्मसृष्टिसंचार। सुषुप्तींत मन-बुद्धि-अहंकार। कामनाकारभार शून्य होय ॥ २४५ ॥ सुषुप्तींत नजर ठेवी देहावरी। श्वासोच्छ्वासें वायू सोडी भरी। हांक मारल्या ये देहावरी। या क्रिया करी जीवतत्त्व ॥ २४६ ॥ जो वायू भरी देहांतरीं। त्याची गणना वायूंत बरी। कीं आकाशविशेषाभीतरीं। याचा अंतरीं विवेक करावा ॥ २४७ ॥ जीव न वायू जीव आकाश। हें पटावें थोड्या विवेकास। तो आकाश परी न जड आकाश। हेंही त्यास पटावें ॥ २४८ ॥ सुषुप्तींत न

सूक्ष्मीं स्थूलीं । तेथें असतां न सुषुप्तिस्थलीं । ही जीवयात्रा त्रिस्थली । चतुर्थ स्थलीं विवेका ओढी ॥ २४९ ॥ जीव चतुर्थ स्थलींचा निवासी । तो कैसा सांपडे मरणासी । त्याची सूक्ष्म मन-आदि मिरासी । तीही ज्यासी न सांपडे ॥ २५० ॥ येणें रीती विवर विवरोनी । मरणाचें अमरणत्व भरावें ध्यानीं । स्थूल-देहमायेचा भंग करोनी । स्वधर्म-आचरणीं रत व्हावें ॥ २५१ ॥ हें शाश्वतधर्माचें प्रधान विधान । यास्तव तात-प्रवचनाचा प्रारंभ येथून । देहमायाभंग अव्यंग झाल्यावीण । परमार्थसंपादन होणें नाहीं ॥ २५२ ॥

परमार्थसंपादन होईल यथोचित । तेव्हां पूर्णतया साधेल सर्वभूतहित । लोकांसी आकर्षिणें सन्मार्गांत । हा लोकसंग्रह-अर्थ पूर्ण तेव्हांची ॥ २५३ ॥ वधर्म आणि शाश्वतधर्म । यांचें अंगांगिभाव-मर्म । जाणिल्या प्राप्त होईल मोक्षशर्म । अन्यथा वृथा श्रम संसारीं ॥ २५४ ॥ शाश्वतधर्म सर्वभूतहित । त्याचें अंग स्वधर्म विहित । स्वधर्म-प्राणप्रतिष्ठा सर्वहितार्थ । हा धर्म-अर्थ

विशद विवेका ॥ २५५ ॥ बृहदा[१]रण्यकीं वर्ण-उत्पत्ति । तीच तातें आपुलया रीतीं । कुरुक्षेत्रीय प्रवचनांत मागुती । मुमुक्षूंप्रती सांगितली ॥ २५६ ॥ संसार विभवशाली व्हावा । यासाठीं एकरूप समाजाचा चतुर्धा उठावा । वर्णधर्म आप-आपुला आचरावा । ऐसा गोडवा ईश्वरी बोध ॥ २५७ ॥ कुलधर्म तो नव्हे वर्णधर्म । जातिधर्म तो नव्हे वर्णधर्म । मित्रधर्म आणि गुरु-शिष्य-धर्म । मुख्य वर्णधर्म हे नव्हती ॥ २५८ ॥ अर्जुनें आपुलया साश्रु-प्रवचनीं । कुलधर्मादिकांची बुडवणी । रणप्रसंगें अनिवार्य ही कहाणी । फिरफिरोनी कथियेली ॥ २५९ ॥ तातें ती कहाणी ऐकिली । तिची सत्यता मौनें अंगिकारिली । परी आपुली रणप्रवणता न निवारिली । रणविमुखता निवारिली अर्जुनाची ॥ २६० ॥

---

१ बृहदारण्यक अध्याय १ ला—ब्रह्म वा इदमग्र आसीदेकमेव । तदेकं सन्न व्यभवत् । तत् श्रेयोरूपम् अत्यसृजत क्षत्रम् । ... ... स नैव व्यभवत् । स विशमसृजत । ...... स नैव व्यभवत् । स शौद्रं वर्णमसृजत । ...... स नैव व्यभवत् । तत् श्रेयोरूपम् अत्यसृजत धर्मम् ।

सूक्ष्मीं स्थूलीं । तेथें असतां न सुषुप्तिस्थलीं । ही जीव-यात्रा त्रिस्थली । चतुर्थ स्थलीं विवेका ओढी ॥ २४९ ॥ जीव चतुर्थ स्थलींचा निवासी । तो कैसा सांपडे मरणासी । त्याची सूक्ष्म मन-आदि मिरासी । तीहि ज्यासी न सांपडे ॥ २५० ॥ येणें रीती विवर विवरोनी । मरणाचें अमरणत्व भरावें ध्यानीं । स्थूल-देहमायेचा भंग करोनी । स्वधर्म-आचरणीं रत व्हावें ॥ २५१ ॥ हें शाश्वतधर्माचें प्रधान विधान । यास्तव तात-प्रवचनाचा प्रारंभ येथून । देहमायाभंग अव्यंग झाल्यावीण । परमार्थसंपादन होणें नाहीं ॥ २५२ ॥

परमार्थसंपादन होईल यथोचित । तेव्हां पूर्णतया साधेल सर्वभूतहित । लोकांसी आकर्षिणें सन्मार्गांत । हा लोकसंग्रह-अर्थ पूर्ण तेव्हांची ॥ २५३ ॥ स्वधर्म आणि शाश्वतधर्म । यांचें अंगांगिभाव-मर्म । जाणिल्या प्राप्त होईल मोक्षशर्म । अन्यथा वृथा श्रम संसारीं ॥ २५४ ॥ शाश्वतधर्म सर्वभूतहित । त्याचें अंग स्वधर्म विहित । स्वधर्म-प्राणप्रतिष्ठा सर्वहितार्थ । हा धर्म-अर्थ

विशद विवेका ॥ २५५ ॥ बृहदा[१]रण्यकीं वर्ण-उत्पत्ति । तीच तातें आपुल्या रीतीं । कुरुक्षेत्रीय प्रवचनांत मागुती । मुमुक्षूंप्रती सांगितली ॥ २५६ ॥ संसार विभवशाली व्हावा । यासाठीं एकरूप समाजाचा चतुर्धा उठावा । वर्णधर्म आप-आपुला आचरावा । ऐसा गोडवा ईश्वरी बोध ॥ २५७ ॥ कुलधर्म तो नव्हे वर्णधर्म । जातिधर्म तो नव्हे वर्णधर्म । मित्रधर्म आणि गुरु-शिष्य-धर्म । मुख्य वर्णधर्म हे नव्हती ॥ २५८ ॥ अर्जुनें आपुल्या साश्रु-प्रवचनीं । कुलधर्मादिकांची बुडवणी । रणप्रसंगें अनिवार्य ही कहाणी । फिरफिरोनी कथियेली ॥ २५९ ॥ तातें ती कहाणी ऐकिली । तिची सत्यता मौनें अंगिकारिली । परी आपुली रणप्रवणता न निवारिली । रणविमुखता निवारिली अर्जुनाची ॥ २६० ॥

---

१ बृहदारण्यक अध्याय १ ला—ब्रह्म वा इदमग्र आसीदेकमेव । तदेकं सन्न व्यभवत् । तत् श्रेयोरूपम् अत्यसृजत क्षत्रम् । ... ... स नैव व्यभवत् । स विशमसृजत । ...... स नैव व्यभवत् । स शौद्रं वर्णमसृजत । ...... स नैव व्यभवत् । तत् श्रेयोरूपम् अत्यसृजत धर्मम् ।

देहमायाभंगार्थ त्यासी बोधून। लगेंच स्वधर्म करी ऐसें तातकथन। हा स्वधर्म वर्णधर्म सर्वहितसाधन। जन्मजातिजविन जातिधर्म नव्हे ॥ २६१ ॥ बुडोत तुझे मित्रधर्म। बुडोत गुरु-शिष्यधर्म। बुडोत कुलधर्म जातिधर्म। पाळी वर्णधर्म हा तातभावार्थ ॥ २६२ ॥ संसारीं ज्ञानप्रवण सत्ताप्रवण। भोग्य-निर्मितिप्रवण सेवाप्रवण। ऐसे चतुर्धा जन-स्वभावगुण। लोकविभव-साधन स्पष्ट दिसती ॥ २६३ ॥ अखिल विश्वाचा समाज। अथवा विश्वांतर्गत विशिष्ट समाज। या चातुर्वर्ण्य-व्यवस्थाबळें निजकाज। यथासंभव आज करीतसे ॥२६४॥ प्रकृतीच्या[१] गुणांचीं कर्में पाहून। तातें तीं संसारीं दिलीं विभागून। यापरी शूद्र वैश्य क्षत्रिय ब्राह्मण। चार वर्ण निर्मियेले ॥ २६५ ॥ या वर्णनिर्माणाचें कारण। बृहदारण्यकीय विभव प्रमाण। विभवार्थ वर्ण-वर्णधर्म-निर्माण। ऐसें प्रवचन तेथें असे ॥ २६६ ॥ विभव लौकिक पारलौकिक। पारलौकिकाचें मूळ लौकिक। भोगावांचून त्यागाचें पीक। कथा काल्पनिक अ-

---

१ चातुर्वर्ण्यं मया सृष्टं गुणकर्मविभागशः।

संभवही ॥ २६७ ॥ भोग-विभवांतुनी व्यष्टित्यागविभव । त्यांतूनी व्यष्टीचें मोक्ष-विभव । त्यांतून अव्यंग लोकसंग्रह-विभव । समष्टि-मोक्षविभव त्यापासूनी ॥ २६८ ॥ समष्टिमोक्षपर तातप्रवचन । व्यष्टिमोक्ष समष्टिमोक्षाचें साधन । त्यागविशेष व्यष्टि-मोक्ष-साधन । त्यागार्थ निर्माण भोग्य विषयांचें ॥ २६९ ॥ हें भोग्यनिर्माण विश्वसमाजीं । अथवा तदंगभूत विशिष्ट समाजीं । भोग्यनिर्माणप्रवणांची राजि । स्वभावें राजी साधावया ॥ २७० ॥ परी भोग्यांचें विभवयुक्त निर्माण । न साध्य सामान्य सेवेकऱ्यांविण । न साध्य असामान्य सत्ताधाऱ्यांविण । नचि तें ज्ञानियांवीण साध्य असे ॥ २७१ ॥ या कारणें ताताची संसारीं । स्वभावप्रतिष्ठित-चातुर्वर्ण्य-चातुरी । सर्वभूतहितसंगाची माधुरी । तात-चातुरी उदया आणी ॥ २७२ ॥ पित्याचा व्यवसाय पुत्र करी । ऐसी सामान्य कर्मरीति जुन्या संसारीं । येणें वर्णधर्मीं जन्मबद्धतेची परी । कालाचे उदरीं जन्मा आली ॥ २७३ ॥ भारतीय युद्धकालीं ही जन्मबद्धता । वर्णांसी आली होती अंशीं बहुता । परी सर्व कालीं ही

संयुक्तता । पोषक सर्वहिता न होय ॥ २७४ ॥ सर्वहितें हें वर्णधर्मांचें प्रयोजन । त्यासी प्रतिकूल होय वर्णांचें जन्मबंधन । त्या कालीं त्या बंधनाचें मोचन । कर्तव्य प्रधान जाणत्यांचें ॥२७५॥ सूर्योदयीं भंगीकाम करी । मग अध्ययन-अध्यापन वरी । भोग्य-निर्मितिकर्तव्य त्यावरी । ऐशी एक परी जीविताची ॥ २७६ ॥ वर्णधर्म सर्व येणें रीतीं । प्रत्येक व्यक्तींत राहूं शकतीं । परी जेथें ज्याची विशेष प्रीति । तेथें त्याची गति विशेष होय ॥ २७७ ॥ स्वभावज गुण संस्कारपरिपूत । व्यक्तीचा वर्ण करिती निश्चित । या वर्णाची खरीखुरी मात । व्यक्तीच्या अंतरांत वास करी ॥ २७८ ॥ बा करी स्वधर्म आपुला । आचरी वर्णधर्म आपुला । ऐशा ताताच्या निश्चित कथनाला । अर्थ आजला कोणता द्यावा ॥ २७९ ॥ आज तुम्हा बहुतांचा स्वधर्म । अथवा संस्कारपरिपूत स्वभावज गुणकर्म । आणि तुमचा परंपरागत जातिधर्म । यांचा ऐक्यक्रम लुप्त झाला॥ २८० ॥ अशा समयीं स्वधर्म आचरी । या तातकथनाच्या अंतरीं । त्याची स्वधर्मनिर्णायक हृदयलहरी । स्वहृदयविवरीं देखिली

पाहिजे ॥ २८१ ॥ सर्वहितार्थ त्याची धर्मव्यवस्था। त्या सर्वहिताविषयीं आपुली आस्था। तीव्र करावी त्यजूनियां अनास्था। मग निज प्रकृतिव्यवस्था पाहावी तुम्हीं ॥ २८२ ॥ निज प्रकृति आणि निज संस्कृति। यांहीं आपणिली असेल जी कार्यपद्धति। तिच्या द्वारा सर्वभूतहितीं। आपुली शक्ति खर्च करावी ॥ २८३ ॥ बा आचरीं स्वधर्म आपुला। याचा हा अर्थ ताताचा आजला। हाच अर्थ भारतयुद्धसमयाला। परी तेव्हां गोंधळाला जागा नव्हती ॥ २८४ ॥ बहुतांशीं जातिबद्धता। वर्णांची त्या कालीं तरवता। म्हणूनी सध्याच्या गोंधळाची सत्ता। तेव्हांच्या धर्मनिरतां ठावी नव्हती ॥ २८५ ॥ अर्जुना निजवर्णधर्म होता ठावा। परी मित्रधर्मादि धर्मांनीं अंतरीं उठावा। करूनी त्याच्या क्षात्रस्वभावा। व्याकुल-भावा नेलें होतें ॥ २८६ ॥ मित्रधर्मादि धर्म अव्यापक। वर्णधर्म त्या सर्वांहूनी व्यापक। अव्यापक व्यापकासी होतां तापक। धर्मसंस्थापक न आदरी त्या ॥ २८७ ॥ म्हणूनी तातें अर्जुनप्रवचन न आदरिलें। अर्जुनें तात-

संयुक्तता । पोषक सर्वहिता न होय ॥ २७४ ॥ सर्वहितें हें वर्णधर्माचें प्रयोजन । त्यासी प्रतिकूल होय वर्णाचें जन्मबंधन । त्या कालीं त्या बंधनाचें मोचन । कर्तव्य प्रधान जाणत्यांचें ॥२७५॥ सूर्योदयीं अंगीकाम करी । मग अध्ययन-अध्यापन करी । भोग्य-निर्मितिकर्तव्य त्यावरी । ऐशी एक परी जीविताची ॥ २७६ ॥ वर्णधर्म सर्व येणें रीतीं । प्रत्येक व्यक्तींत राहूं शकती । परी जेथें ज्याची विशेष प्रीति । तेथें त्याची गति विशेष होय ॥ २७७ ॥ स्वभावज गुण संस्कारपरिपूत । व्यक्तीचा वर्ण करिती निश्चित । या वर्णाची खरीखुरी मात । व्यक्तीच्या अंतरांत वास करी ॥ २७८ ॥ बा करी स्वधर्म आपुला । आचरी वर्णधर्म आपुला । ऐशा ताताच्या निश्चित कथनाला । अर्थ आजला कोणता द्यावा ॥ २७९ ॥ आज तुम्हा बहुतांचा स्वधर्म । अथवा संस्कारपरिपूत स्वभावज गुणकर्म । आणि तुमचा परंपरागत जातिधर्म । यांचा ऐक्यक्रम लुप्त झाला॥ २८० ॥ अशा समयीं स्वधर्म आचरी । या तातकथनाच्या अंतरीं । त्याची स्वधर्मनिर्णायक हृदयलहरी । स्वहृदयविवरीं देखिली

पाहिजे ॥ २८१ ॥ सर्वहितार्थ त्याची धर्मव्यवस्था । त्या सर्वहिताविषयीं आपुली आस्था । तीव्र करावी त्यजूनियां अनास्था । मग निज प्रकृतिव्यवस्था पाहावी तुम्हीं ॥ २८२ ॥ निज प्रकृति आणि निज संस्कृति । यांहीं आपणिली असेल जी कार्यपद्धति । तिच्या द्वारा सर्वभूतहितीं । आपुली शक्ति खर्च करावी ॥ २८३ ॥ बा आचरीं स्वधर्म आपुला । याचा हा अर्थ ताताचा आजला । हाच अर्थ भारतयुद्धसमयाला । परी तेव्हां गोंधळाला जागा नव्हती ॥ २८४ ॥ बहुतांशीं जातिबद्धता । वर्णाची त्या कालीं तत्त्वता । म्हणूनी सध्याच्या गोंधळाची सत्ता । तेव्हांच्या धर्मनिरतां ठावी नव्हती ॥ २८५ ॥ अर्जुना निजवर्णधर्म होता ठावा । परी मित्रधर्मादि धर्मांनीं अंतरीं उठावा । करूनी त्याच्या क्षात्रस्वभावा । व्याकुल-भावा नेलें होतें ॥ २८६ ॥ मित्रधर्मादि धर्म अव्यापक । वर्णधर्म त्या सर्वांहूनी व्यापक । अव्यापक व्यापकासी होतां तापक । धर्मसंस्थापक न आदरी त्या ॥ २८७ ॥ म्हणूनी तातें अर्जुनप्रवचन न आदरिलें । अर्जुनें तात-

मी हें घोर कर्म करीन । तरी मज होईल शोक दारुण । स्वर्गराज्येंही तयाचें शमन । अशक्य मन सांगें माझें ॥ ३०३ ॥ यावरी तातें प्रेमें हंसून । आरंभिलें आपुलें प्रवचन । प्रथम देहमायाभंगार्थ बोध करून । मग वैराग्यपरीक्षण केलें तयाचें ॥ ३०४ ॥ स्वर्गासाठीं कीर्तीसाठीं । झुंजें तूं निंदा टळण्यासाठीं । इत्यादि प्रकारें परीक्षेसाठीं । पार्था जगजेठी बोलिला बहू ॥ ३०५ ॥ पार्थ हालेना ऐशा वचनीं । पाहोनी तात प्रसन्न मनीं । उपदेशी बुद्धियोगाची कर्मसरणी । मोक्षासी गवसणी जेणें पडे ॥ ३०६ ॥

नको भोग ऐहिक स्वर्गीय । तुला व्हावी आत्यंतिक मोक्षसोय । तरी त्याचा सुलभ उपाय । घेणें साहाय्य योगाचें ॥३०७॥ ऐसें वदोनी तातें अर्जुनासी । बुद्धियोगाची दाविली मिरासी । जेथें पाप-पुण्यांचिया राशी । मोक्ष-हौसी दूरी फेंकिती ॥ ३०८ ॥ बुद्धि सामान्य बाह्याश्रयी । इंद्रियांच्या विषयांत मग्न राही । येथें वा स्वर्गीं इंद्रियांची सोई । पाहाण्याच्या मोहीं सदा असे ॥ ३०९ ॥ वैदिक ईश्वरवादी थोर

ते स्वर्गसुखासाठीं बेजार । नाना काम्य क्रियांचा बाजार । मांडूनी जोजार वाढविती ॥ ३१० ॥ ते ईश्वरवादी ईश्वरासी विसरले । चवचाल इंद्रियां-पाठीं घसरले । ईश्वर अंतरीं ते बाहेरी पसरले । काळें ओसरलें पुण्य त्यांचें ॥ ३११ ॥ स्वर्ग-पृथ्वीच्या येर-जाऱ्या । या वैदिकांच्या इतुक्याच भराऱ्या । त्यांना थोर मोक्षपदाच्या पायऱ्या । न दिसल्या खऱ्या म्हणो-नियां ॥ ३१२ ॥ तातें स्वर्गहौसी वैदिक निंदिले । मोक्षहौसी अ-वैदिक वंदिले । विषयांचे फंदीं जे फांदिले । त्या वैदिकीं बांधिलें स्वतांसी स्वयें ॥ ३१३ ॥

बुद्धि नसावी इंद्रियांची दासी । बुद्धि वसावी आत्मारामापासी । तेव्हांचि पाप-पुण्यांचिया राशी । नासोनि मोक्षासी अधिकारी होय ॥ ३१४ ॥ परी इंद्रियांचें इंद्रियार्थीं वागणें । हें तों देहधरा अशक्य त्यागणें । म्हणूनी कर्मसंन्यासधर्माचें सांगणें । केवळ रांगणें रांगत्या मनाचें ॥ ३१५ ॥ प्रौढ चालत्या विवेकी मनासी । मोक्षयुक्ति दिसे कर्मफलसंन्यासीं । आत्मस्थ बुद्धि सर्वां इंद्रियांसी । वागवीं वेशा आपु-

लीया ॥ ३१६ ॥ आत्मस्थ बुद्धि आत्मसुख-आसक्त । आत्मस्थ बुद्धि विषयसुखीं विरक्त । आत्मस्थ बुद्धि स्वधर्म-अनुरक्त । सर्वभूतभक्त आत्मस्थ बुद्धि ॥ ३१७॥ आत्मानात्मविवेक केला वा ऐकिला । अनात्मा विवेकें वा श्रद्धेनें सांडिला । आत्म्यांत वा परमात्म्यांत ठाव घेतला । आनंद लुटिला अंतःसुखाचा ॥ ३१८ ॥ हा विवेकी ध्यानियांचा मार्ग । हा श्रद्धाळू ध्यानियांचा मार्ग । हा संयमी ध्यानियांचा मार्ग । अंतःसुखस्वर्ग आतुडे येणें ॥ ३१९ ॥ विवेकप्रधान सांख्य वा ज्ञान-योगी । श्रद्धाप्रधान भक्तियोगी । संयमप्रधान अभ्यास-योगी । आत्मयोगी हे सर्वही ॥ ३२० ॥ विवेक वा श्रद्धा अपुरी पडे । तेथें संयम अभ्यासिणें पडे । मन बाह्य विषयांकडे ओढे । तों न सांपडे अंतःसुख ॥३२१॥ सांख्यांचा ध्यानविषय आत्मा वा परमात्मा । साक्षि-स्वरूप अकर्ता अभोक्ता आत्मा । तेथें बसूनी प्रकृति-कार्यमहिमा । पाहे अकामा सांख्यबुद्धि ॥ ३२२ ॥ भक्तांचा ध्यानविषय ईश्वर सर्वकर्ता । संयमीयांचा कर्ता वा अकर्ता । अवतारादिही ध्यानविषय भक्ता ।

विभूति-अनुरक्ता विनयशीला ॥ ३२३ ॥ विवेकी भक्त आणि संयमी । ध्यान लावोनी पडले आरामीं । स्वकर्मे वर्जूनियां आत्मारामीं । आनंदधामीं विराम पावले ॥ ३२४ ॥ तात जगन्नाटकाचा चालक । त्यासी कर्मविराम नसे क्षण एक । त्याच्या अंशांहीं कर्म-विरामकौतुक । परम मोक्षसुख मानियेलें ॥ ३२५ ॥ ताता हे न माने अ-कर्मरति । कर्मीं आराम भोगी तन्मति । तीच कर्मीं नैष्कर्म्य-स्थिति । तो मुमुक्षूप्रती उपदेशी ॥ ३२६ ॥ असो अभ्यासयोग-असमर्थता । असो ज्ञानयोग-असमर्थता । असो ध्यानयोग-अस-मर्थता । असो असमर्थता श्रवणादिकीं ॥ ३२७ ॥ परी नसो कर्मफलत्याग-असमर्थता । फलत्यागीं बिलगली शांति-समर्थता । म्हणूनी मुमुक्षूनें ती त्याग-समर्थता । आपुल्या हातां प्रथम आणावी ॥ ३२८ ॥ स्वधर्म-कर्म सर्वभूतहितार्थ । तें वर्जूनियां मोक्षप्राप्त्यर्थ । आचरणें अभ्यासादि पुरुषार्थ । स्वार्थी परमार्थ ताता गमे ॥ ३२९ ॥ स्वकर्मसंन्यासयुक्त अभ्यासादि । ही एक स्वार्थबुद्धिसंवर्धक उपाधि । ही मुमुक्षू जीवातें बाधी ।

तोंवि त्या न बाधी स्वकर्मरति ॥ ३३० ॥ स्वकर्में बाधक बंधक नसती । बाधक बंधक कर्मफलासक्ति । अभ्यासिणें कर्मफल-अनासक्ति । प्रथम युक्ति मोक्षयुक्तींत ॥ ३३१ ॥ कर्मण्येवाधिकारस्ते । स्वकर्म केव्हांही न टाकावें परतें । न धरावें कर्मफलहेतूंतें । थोर आत्म्यासी तेथें अधिकार नाहीं ॥ ३३२ ॥ सर्वभूतहितार्थ स्वकर्म-आचार । थोर आत्म्याचा अनुरूप अधिकार । तत्फलविषयीं रागद्वेष-विकार । हा अधिकार हीन[१] आत्म्याचा ॥ ३३३ ॥ म्हणूनी श्रेष्ठ स्वकर्म अनासक्त करणें । अ-कर्मी अभ्यासादि त्याहुनी उणें । ऐसें द्वादशाध्यायीं जीवींचें सांगणें । मोक्षमार्गनिपुणें सांगितलें तातें ॥ ३३४ ॥ स्वकर्में उत्साहानें करावीं । फलांविषयीं उदासीनता धरावी । बुद्धि अंतरात्म्यांत भरावी । येणें तरावी राग-द्वेष-खळबळ ॥ ३३५ ॥ अंतरात्मा ईश्वराचा अंश । तो नसे प्रकृतीचा दास । प्रकृतींतूनी इंद्रियास मनास । घेऊनी दास आपुले करी ॥ ३३६ ॥ या दासांचे दास

१ गी. अ. २, श्लो. ४९.

व्हावें । हें अंतरात्मा कसें शोभावें । ऐसें विवरोनी विवेकी भावें । राग-द्वेष सोडावे इंद्रियांचे ॥ ३३७ ॥ कर्में नेमिलीं सर्वभूतहितार्थ । तीं करणें हा ईश्वरसंमत पुरुषार्थ । तो करूनी ईश्वरप्रीत्यर्थ । कर्मफलितार्थ त्यासी समर्पावा ॥ ३३८ ॥

कर्मफलीं आसक्ति सोडावी । ती ईश्वरचरणीं जोडावी । ईश्वरविस्मृति समूळ तोडावी । जोडी फोडावी जीव-प्रकृतीची ॥ ३३९ ॥ जीव आणि प्रकृति । दोनचि तत्त्वें ह्या जगतीं । देखतां जीवासी न होय मुक्ति । प्रकृतीची सक्ति थोडी नसे ॥ ३४० ॥ प्रकृतीचा पति ओळखावा । त्यासी आपुला पाठिराख करावा । तेव्हांचि प्रकृतीचा जोरावा । थंडावुनी जीवा स्वातंत्र्य लाभे ॥ ३४१ ॥ जीवें रहावें प्रकृतीचे दास । अथवा व्हावें ईश्वराचे दास । यांवीण तिसरा मार्ग त्यास । चालावयास असेना ॥ ३४२ ॥ प्रकृति-दास्याची स्वतंत्रता । अथवा ईश्वरदास्याची स्वतंत्रता । यांहूनी तिसरी स्वतंत्रता । देहांत असतां जीवा नाहीं ॥ ३४३ ॥ निद्रा आळस आणि दुर्लक्ष । हा मानवप्रकृतीचा

कनिष्ठ पक्ष । त्यांतूनी त्या जीवाचा मोक्ष । ईश्वरचि दक्ष करीतसे ॥ ३४४ ॥ निर्मूनी नाना सुखदु:खप्रसंग । अप्रिय करवी तमाचा संग । जेणें जीव लोभी प्रवर्त्तीत दंग । होय रजसंग सेवूनियां ॥ ३४५ ॥ निर्मूनी नाना सुखदु:खप्रसंग । अप्रिय करवी रजाचा संग । जेणें जीव निर्लोभ निवृत्त ज्ञानीं दंग । होय सत्त्वसंग सेवूनियां ॥ ३४६ ॥ निर्मूनी नाना सुखदु:खप्रसंग । अप्रिय करवी सत्त्वाचा संग । जेणें जीव गुणातीत-वृत्तींत दंग । होय ईश्वरसंग सेवूनियां ॥ ३४७ ॥ खनिज उद्भिज्ज मानवेतर प्राणी । जीवाच्या या असंख्यात योनी । तेथें नाना देहांत अनुभव घेऊनी । मग मानवयोनि जीव घेई ॥ ३४८ ॥ मानव-योनि रजाची वा तमाची । यथानुभव प्रथम मिळायाची । मग यथाक्रम योनि सत्त्वाची । आणि गुणातीताची मिळे जीवा ॥ ३४९ ॥ येणें रीती अनेक जन्मसंसिद्ध । जीव होई गुणातीत सिद्ध । या विकासाचा कर्ता आदिसिद्ध । शुद्ध आदिबुद्ध ईश्वरचि असे ॥ ३५० ॥

त्या ईश्वराची विस्मृति टाकावी । तच्चरणीं मनोवृत्ति सर्वथा वांकावी । तद्दासत्वें देहनौका हांकावी । तेव्हां चाखावी गुणातीत शांति ॥ ३५१ ॥ देह स्वकर्मीं राबवावा । तो श्रम ईश्वरचरणीं समर्पावा । ईश्वरें व्यापिला हा संसार आघवा । तोचि प्रकृतिविभवा आधार असे ॥ ३५२ ॥ स्वकर्म करावें यथासांग । विवेकें शोधावें प्रत्येक कर्मांग । कोठेंही राहूं न द्यावें व्यंग । अति सुरंग रंगवावें तें ॥ ३५३ ॥ ऐसें कर्म अव्यंग सुंदर । तेणें प्रेमें पुजावा ईश्वर । ईश्वर-भक्तीचा हा प्रकार । आवडे फार मत्तातातें ॥ ३५४ ॥ कर्तव्य आपुलें तेंचि करावें । दुसऱ्याचे कर्तव्यीं न शिरावें । कर्तव्य आपुलें आणि परावें । यांचें न करावें मूढ-मिश्रण ॥ ३५५ ॥ आपुलें कर्तव्य दोषयुक्त दिसे । दुसऱ्याचें तें निर्दोष भासे । परी कर्मीं दोष सर्वत्र वसे । निर्दोष नसे एकही कर्म ॥ ३५६ ॥ सर्व भूतहितार्थ स्व-स्व-कर्मव्यवस्था । या व्यवस्थेविषयीं नसावी अनास्था । कर्तव्यविभागणी समाजा समस्ता । एकमेव रस्ता निज विकासार्थ ॥ ३५७ ॥ समष्टि-

विकासापोटीं व्यष्टिविकास। व्यष्टिविकासापोटीं समष्टिविकास। यांचा अन्योन्य-हित-निदिध्यास। विश्वविकास वेगें चालवी ॥ ३५८ ॥ विश्व नाना समष्टींचा समूह। प्रत्येक समष्टि नाना उपसमष्टि-समूह। सर्वत्र नाना-ध्येय-आरोह-अवरोह। तेथें कर्तव्यव्यूह निर्दोष कैंचा ॥ ३५९ ॥ म्हणोनी दुसऱ्याचें कर्तव्य तें बरें। हें नसावें अविवेकाचें वारें। आपुलें कर्तव्य जें खरें। तें करावें आदरें ईश्वरपूजार्थ ॥ ३६० ॥

स्वकर्मार्पणें करितां ईश्वरभक्ति। क्रमें दूर होय कर्मफलासक्ति। दूर होय अहं-कर्तृत्व-मति। ब्रह्मनिर्वाण मति लाभे [१]ज्ञानें ॥ ३६१ ॥ कर्मसंन्यासी[२] अभ्यास ध्यान। करूनी, आसक्तिहीन अहंकारहीन। होऊनी ईशभक्ति परमपावन। जोडोनि, निर्वाण पावती ज्ञानें ॥ ३६२ ॥ भक्तीच्या पोटीं जें ईश्वरज्ञान। तें प्राप्त केल्यावांचून। जीवा न लाभे ब्रह्मनिर्वाण। हें तातकथन मुमुक्षू जनां ॥ ३६३ ॥ संन्यासयुक्त सांख्य-

---

१ गी. अ. १०, श्लो. १०,११; गी. अ. ६, श्लो. ४७; गी. अ. ७, श्लो. १. २ गी. अ. १८, श्लो. ५० ते ५५.

वेदांत-ज्ञान[1]। संन्यासयुक्त अभ्यासयोगसाधन। जोडोनि ईश्वरभक्ति पावन। ब्रह्मनिर्वाण पावताती ॥ ३६४ ॥

जो भक्त जाहला ईश्वराचा। तो भक्त होय स्व-कर्माचा। तो तातवत् सर्वभूतहिताचा। लोकसंग्रहाचा प्रेमी होय ॥ ३६५ ॥ ताताचा लोकसंग्रह तोंवरी चाले। जोंवरी अवघें विश्व निर्वाण न पावलें। तेथें तातभक्त जे मुक्त जाहले। ते आनंदें धांवले तत्सेवेसी ॥ ३६६ ॥ निज विकासार्थ गतागत। जन्म-मृत्यु-चक्रीं बद्ध फिरत। या पुनरावृत्तींतुनी मुक्त। त्या नांव मुक्त मोक्षशास्त्रीं ॥ ३६७ ॥ ही [2]पुनरावृत्ति दुःखालय। ही त्या महात्म्यांसी न होय। जे परम मोक्षसिद्धीचा ठाय। ताताचे पाय धरुनी पावले ॥ ३६८ ॥ परी पुनरावृत्ति जी कीं दिव्य। तातसम लोकोद्धारार्थ सदय। भवभीतां भेटवाया अभय। ती मुक्तां न होय ऐसें नव्हे ॥ ३६९ ॥ मुक्त तो मुक्त सर्वथा मुक्त। भक्त तो भक्त सर्वदा भक्त। जो मुक्त सर्वथा सर्वदा भक्त। तो

---

१ गी. अ. ७, श्लो. १६, १७, १८. २ गी. अ. ८, श्लो. १५.

तात-अनुरक्त मुक्तपणें ॥ ३७० ॥ तात म्हणे निजधामीं वसावें । तरी तेथें मुक्त भक्त विसावे । तात म्हणे मृत्युलोकीं असावें । तरी चंग कसावे अवतराया ॥ ३७१ ॥ ही भक्तीची परम सीमा । ही मुक्तीची परम सीमा । मुक्त-पुनरावृत्तीचा महिमा । मुक्त भक्तात्मा तोचि जाणे ॥ ३७२ ॥ ही पुनरावृत्ति मुक्ता निषिद्ध । तरी तो मुक्त नव्हे तो सर्वथा बद्ध । जीवें कशासी व्हावें संसिद्ध । जरी दुजे बद्ध दूरावती त्या ॥ ३७३ ॥ तातमतीं मुक्त-पुनरावृत्ति । बद्धमोचनार्थ बद्धसंगति । ही परागतीहूनी परागति । तत्प्रवचनीं ती ध्वनित असे ॥ ३७४ ॥ माझें दिव्य जन्म दिव्य कर्म । यांचें तत्त्व जाणे त्या न पुनर्जन्म । तो मजपासी ये माझा भाव धर्म । त्याचा भाव धर्म होत असे ॥ ३७५ ॥ ऐसें ताताचें स्पष्ट वचन । तेथें अदिव्य बद्धवत् पुनर्जनन । नाहीं तत्त्वज्ञां हें शाब्दित कथन । दिव्य मुक्त-जनन ध्वनित केलें ॥ ३७६ ॥ दिव्य कर्मांचा तत्त्वज्ञ । दिव्य कर्म करी प्राज्ञ । सत्परित्राणार्थ आत्मयज्ञ । करूनी

अधियज्ञ आपुला करी ॥ ३७७ ॥ तेणें ऐसेंचि जाणणें जाणावें । जाणिलें व्यवहारीं आणावें । हें तातें अन्यत्रही प्रेमभावें । मुमुक्षूंसी ठावें केलें असे ॥ ३७८ ॥ [१]मी कर्में करीं परी कर्मलेप । मला न लागे मी निर्लेप । याचें कारण फलेच्छेची झेंप । मच्चित्तविक्षेप करीत नाहीं ॥ ३७९ ॥ येणें रीती मज जो जाणे । त्यासी न बांधिती कर्मबंधनें । या निरूपणीं मत्तातानें । स्वसंमत जाणणें जाणविलें असे ॥ ३८० ॥ जाणूनी ईश्वराचा फलत्याग । आपण करावा तैसा त्याग । हें खरें जाणणें यथासांग । ऐसें अंतरंग ताताचें येथें ॥ ३८१ ॥ फलत्यागज्ञान फलत्याग करणें । दिव्यकर्मज्ञान दिव्य कर्में करणें । तेंवि दिव्य-जन्म-ज्ञान दिव्य जन्म घेणें । हें तात-सांगणें मुक्तिविषयक ॥ ३८२ ॥ मुमुक्षूनें कर्मफलें दूर सारावीं । मुमुक्षूनें दिव्यकर्में आचरावीं । ये रीती मुक्ति आपुली करावी । मग वरावी दिव्यजन्मपद्धति ॥ ३८३ ॥ ऐशी ताताची ध्वनित सांगणी । ही

---

[१] गी. अ. ४, श्लो. १४.

प्रधान-तातमतप्रतिपादिनी । अ-पुनरावृत्तीची शब्दित कहाणी । त्याचिया मनीं गौण अप्रधान ॥ ३८४ ॥ पुनरावृत्तीसी कंटाळले । भवतापानें बहु पोळले । ते अ-पुनरावृत्तीसी भाळले । त्यांचे पाळले लळे तातानें ॥ ३८५ ॥ इहलोकीं करावया कर्म नीट । तो स्वर्ग-भोगांकडे दावी बोट । जेणें इहलोकींचे भोग वोखट । स्वर्गलंपट सोडीतसे ॥ ३८६ ॥ परी जीवात्म्याचा पूर्ण विकास । नसे तयाचा स्वर्गविशेष-वास । म्हणूनी स्वर्गभोगाविषयीं त्रास । तात तन्मनास वाटवीतसे ॥३८७॥ त्रयीधर्माचे अविवेकी दास । त्यांसी स्वर्गसुखाचा हव्यास । परी तया गतागताचा आयास । ऐसें मुमुक्षूंस तो सांगे ॥३८८॥ गतागत नको तुम्हांस । तरी टाका कर्मफलाची हीन आस । ऐसें बोधूनी मुमुक्षू जीवांस । त्यां निजपदास घेऊनी जाई ॥३८९॥ निजपदस्थां नाहीं गतागत । हें ऐकूनी जे तिकडे धांवत । त्यांसी मुक्त-पुनरावृत्तीचें मत । भयानें संत्रस्त करील वायां ॥३९०॥ हें जाणे तात प्रेमसागर । म्हणूनी तेणें अ-पुनरावृत्तीचें थोर । माहात्म्य गाउनी निजधाम-

परं। म्हणितलें घर अ-पुनरावृत्तीचें ॥३९१॥ बद्धवत् पुनरावृत्ति तेथुनी नसे। म्हणूनी हें तातशब्दित सत्य असे। परी मुक्त मुक्तपणें जन्म घेतसे। हें तातध्वनित त्याहुनी सत्य ॥३९२॥ हें ध्वनित सत्य श्रेष्ठतर। दुजें शब्दित तें सत्य अवर। गणाया कारण समष्टिमोक्ष-व्यवहार। गणिला थोर व्यष्टिमोक्षाहुनी ॥३९३॥ जीव जाहला जीवन्मुक्त। तेणें चालवावें निजधर्मव्रत। अज्ञानमुक्त म्हणोनि कर्तव्यमुक्त। समजणें अयुक्त आपणासी ॥३९४॥ हें तातमत त्याचे प्रवचनीं। तेणें स्पष्ट केलें असे स्पष्ट वचनीं। आपुलें उदाहरण पुढें करूनी। लोकसंग्रह-शिकवणी शिकविली असे ॥३९५॥ अ-मुक्तें उदारें लोकसंग्रह करावा। जीवन्मुक्तें उदारें लोकसंग्रह करावा। तो विदेहमुक्तें न आदरावा। या अ-युक्तभावा न भावी तर्क ॥३९६॥ न भावी तर्क न भावी प्रेम। तें मत प्रकाश-प्रेमधाम। तात आदरील विश्वमोक्षकाम। हें म्हणणें श्रम वाचेचा वायां ॥३९७॥ असो समष्ट्यर्थ मुक्त-पुनरावृत्ति। असे प्रधान ताताच्या मतीं। समष्टिमोक्षार्थ व्यष्टिमोक्षस्थिति। तियेची

प्रधान-तातमतप्रतिपादिनी । अ-पुनरावृत्तीची शब्दित कहाणी । त्याचिया मनीं गौण अप्रधान ॥ ३८४ ॥ पुनरावृत्तीसी कंटाळल । भवतापानें बहु पोळले । ते अ-पुनरावृत्तीसी भाळले । त्यांचे पाळले लळे तातानें ॥ ३८५ ॥ इहलोकीं करावया कर्म नीट । तो स्वर्ग-भोगांकडे दाववी बोट । जेणें इहलोकींचे भोग वोखट । स्वर्गलंपट सोडीतसे ॥ ३८६ ॥ परी जीवात्म्याचा पूर्ण विकास । नसे तयाचा स्वर्गविशेष-वास । म्हणूनी स्वर्गभोगाविषयीं त्रास । तात तन्मनास वाटवीतसे ॥३८७॥ त्रयीधर्मांचे अविवेकी दास । त्यांसी स्वर्गसुखाचा हव्यास । परी तया गतागताचा आयास । ऐसें मुमुक्षूंस तो सांगे ॥३८८॥ गतागत नको तुम्हांस । तरी टाका कर्मफलाची हीन आस । ऐसें बोधूनी मुमुक्षू जीवांस । त्यां निजपदास घेऊनी जाई ॥३८९॥ निजपदस्थां नाहीं गतागत । हें ऐकूनी जे तिकडे धांवत । त्यांसी मुक्त-पुनरावृत्तीचें मत । भयानें संत्रस्त करील वायां ॥३९०॥ हें जाणे तात प्रेमसागर । म्हणूनी तेणें अ-पुनरावृत्तीचें थोर । माहात्म्य गाऊनी निजधाम-

परे । म्हणितलें घर अ-पुनरावृत्तीचें ॥३९१॥ बद्धवत् पुनरावृत्ति तेथुनी नसे । म्हणूनी हें तातशब्दित सत्य असे । परी मुक्त मुक्तपणें जन्म घेतसे । हें तातध्वनित त्याहुनी सत्य ॥३९२॥ हें ध्वनित सत्य श्रेष्ठतर । दुजें शब्दित तें सत्य अवर । गणाया कारण समष्टिमोक्ष-व्यवहार । गणिला थोर व्यष्टिमोक्षाहुनी ॥३९३॥ जीव जाहला जीवन्मुक्त । तेणें चालवावें निजधर्मव्रत । अज्ञानमुक्त म्हणोनि कर्तव्यमुक्त । समजणें अयुक्त आपणासी ॥३९४॥ हें तातमत त्याचे प्रवचनीं । तेणें स्पष्ट केलें असे स्पष्ट वचनीं । आपुलें उदाहरण पुढें करूनी । लोकसंग्रह-शिकवणी शिकविली असे ॥३९५॥ अ-मुक्तें उदारें लोकसंग्रह करावा । जीवन्मुक्तें उदारें लोकसंग्रह करावा । तो विदेहमुक्तें न आदरावा । या अ-युक्तभावा न भावी तर्क ॥३९६॥ न भावी तर्क न भावी प्रेम । तें मत प्रकाश-प्रेमधाम । तात आदरील विश्वमोक्षकाम । हें म्हणणें श्रम वाचेचा वायां ॥३९७॥ असो समष्ट्यर्थ मुक्त-पुनरावृत्ति । असे प्रधान ताताच्या मतीं । समष्टिमोक्षार्थ व्यष्टिमोक्षस्थिति । तियेची

प्राप्ति ज्ञानविज्ञानें ॥३९८॥

ब्रह्मज्ञान आणि योगविज्ञान। दोन्ही मोक्ष-अंगें समान। योगीं सर्व मार्ग समान। कोणा अधिक ऊन लेखूं नये ॥३९९॥ तातें बहु प्रशंसिलें ज्ञान। बहु प्रशंसिलें कर्म-आचरण। बहु प्रशंसिलें अनासक्तपण। आत्मतुष्टपण बुद्धीचें ॥ ४०० ॥ तातें बहु प्रशंसिलें श्रद्धाळूपण। बहु प्रशंसिलें चित्तसंयमन। बहु प्रशंसिलें वैराग्य, भजन। विभूतिध्यान ईश्वराचें ॥ ४०१ ॥ अर्जुना तूं ज्ञान संपादीं। अर्जुना अभ्यासयोग साधीं। अर्जुना लावीं भक्तिसमाधि। स्वकर्मीं धी व्हावी अर्जुना ॥४०२॥ ऐशी तातप्रवचन-पद्धति। सर्व साधनीं समान प्रीति। याचें कारण सर्व साधन-संपत्ति। सहकार्यें मुक्ति व्यष्टीसी देत ॥४०३॥ कर्मसंन्यास आणि कर्म-असंन्यास। दोहीं मार्गीं निश्रेयस। हें तातवचन अभ्यासकास। तात-मानस स्पष्ट करी ॥ ४०४ ॥ व्यष्टि-मुक्तीस दोन्ही समान। परी समष्टिहितसाधक कर्म-आचरण। ताताचें समष्टि-हित-धोरण। आहे कारण कर्मयोग-प्रशंसनीं ॥ ४०५ ॥

सं. ........ नं. ........

सर्वभूतहित सर्वभूतमोक्ष । इकडे ताताचें सर्वाधिक लक्ष । एतदर्थ बोध प्रत्यक्ष अ-प्रत्यक्ष । तात मोक्षाध्यक्ष दक्षतेनें करी ॥ ४०६ ॥ देहमायेचा सर्वथा भंग । सर्वेशसंग सर्वभूतहितसंग । आणि लोकसंग्रह अथांग । ऐसें चतुरंग माझें हृदय ॥ ४०७ ॥ यांत सर्वहितसंग सर्वश्रेष्ठ । दुसरीं अंगें त्याहूनी कनिष्ठ । या चौघांपोटीं समाविष्ट । दुजीं मोक्षनिष्ठ माझीं अंगें ॥ ४०८ ॥ अभ्यासयोगी[१] सर्वभूतहितरत । ज्ञानयोगी[२] सर्वभूतहितरत । अभ्यासयुक्त ज्ञानयोगी तन्निरत । ब्रह्मत्व पावत तातें बोधिलें ॥ ४०९ ॥ लोकसंग्रहार्थ[३] स्वकर्मे करी । लोकसंग्रहार्थ[४] मी कर्मे आचरीं । लोकबुद्धिभेद[५] न करावा विद्वद्वरीं । ऐशी व्यवहारचातुरी तातें बोधिली ॥ ४१० ॥ देहाच्या[६] मायेचा भंग करी । जीवांच्या[७] हिताची चिंता करी । सर्वजीवेशा[८] सर्वभावें जवळ

---

१ गी. अ. ५, श्लो. २६ २ गी. अ. १२, श्लो. ३,४. ३ गी. अ. ३, श्लो. २०. ४ गी. अ. ३, श्लो. २२. ५ गी. अ. ३, श्लो. २५।२६. ६ गी. अ. २, श्लो. ११ ते २५. ७ गी. अ. ६, श्लो. ३२. ८ गी. अ. १८, श्लो. ६२.

करी । ऐसी जीवन-परी तातें बोधली ॥ ४११ ॥ अर्जुनीं स्थिरावला जो बोध । तो बोध ऐसा चतुर्विध । तात-प्रवचनाचें फल हें शुद्ध । अर्जुन-युद्ध या फळाचें फल ॥ ४१२ ॥ ग्रंथाचा मुख्य अर्थ गौण अर्थ । विवेकें करावया निश्चित । त्याचा आदि अंत विशेष फलित । बहुवार-कथित शोधावें ॥ ४१३ ॥ या शोधानें मुख्य-गौण अर्थ अनुमानावे । त्यांचें अंगांगित्व तर्कें साधावें । तें सिद्ध होतां सिद्ध मानावें । अनुमानित आघवें अर्थ-अंगांगित्व ॥४१४॥ मुख्य-अर्थसंघ तें ग्रंथतात्पर्य । गौण-अर्थसंघ अर्थवादसंचय । ऐसा मीमांसकांचा तात्पर्य-निर्णय-संप्रदाय । तेणेंही सिद्ध होय चतुरंग तात्पर्यत्व-॥ ४१५ ॥ आदि देहमायाभंगार्थ बोध । अंत ईश्वरैक-शरणत्व बोध । बहुकथित लोकसंग्रह सर्वहितबोध । फलित बोध अर्जुनीं ठसावला हें ॥४१६॥ हा चतुरर्थ-बोध ग्रंथविशेष । या अर्थसंघापोटीं दुसरा अर्थसंघ निःशेष । अंगत्वभावें पाहावयास । सद्विवेकास आयास नाहीं ॥ ४१७ ॥ तातप्रवचन सर्वभूतमोक्षपर । सर्व-भूतमोक्ष त्याचें तात्पर्य थोर । या मोक्षाचीं साधक

अंगें चार। यत्संघ सुंदर मद्‌हृदय मी गणों ॥ ४१८॥

श्रीआचार्य शंकर व्यष्टिमोक्ष। माझा मानिती प्रमुख पक्ष। परी माझें साध्य समष्टिमोक्ष। तया व्यष्टिमोक्ष साधनभूत ॥ ४१९ ॥ लोकमान्या नीति अध्यात्मनिष्ठ। माझें हृदय दिसे इष्ट। परी अध्यात्म सर्व लोकीं पुष्ट। करणें गुह्य गोष्ट माझी प्रधान ॥४२०॥ व्यष्टीची अध्यात्मनिष्ठ नीति। पोषी समष्टीची अध्यात्मसंपत्ति। जेणें समष्टीची मोक्षमार्गावरती। पदें पडती द्रुत गतीनें ॥ ४२१ ॥ जीवन्मुक्त ज्ञानयोगनिष्ठ। कर्मयोगनिष्ठाहुनी कनिष्ठ। तातें गणायाचें कारण स्पष्ट। त्याचें परम इष्ट सर्व जीवमुक्ति ॥ ४२२ ॥

असो आतां जीवाची मुक्ति कैसी होय। त्या कैसा मिळे परम शांतीचा ठाय। हें विचारितां चतुरंग उपाय। जीव-सहाय स्पष्ट दिसे ॥४२३॥ मुमुक्षूनें देह-माया दूरवावी। ईशपदीं बुद्धि वाहावी। सर्वहितार्थ दुःखें सहावीं। दक्षता ठेवावी लोकसंग्रहीं ॥४२४॥ सर्व शब्दें देव-मनुष्य-तिर्यगादि समस्त। लोक शब्दें मानव अभिप्रेत। मुमुक्षूनें वरावें सर्वहितव्रत। ऐसें तातमत

स्पष्ट असे ॥४२५॥ लोकसंग्रह लोकां सन्मार्गीं लावणें। हें शक्य उपदेशें उदाहरणें। उदाहरणावीण उपदेश देणें। तें लोक भरणें असन्मार्गांत ॥४२६॥ मानवहिताचा करितां विचार। भोगादि मोक्षान्त सर्व प्रकार। जीवाजीवासी यथाधिकार। विकासानुसार हिताचे दिसती ॥४२७॥ मुमुक्षू भोगासी विटला असे। त्यासी शांतीचें लागलें पिसें। तेणें ईशपदाच्या निदिध्यासें। विषयांचे तमाशे टाळावे ॥४२८॥ ईशपदाचा निदिध्यास। त्याच्या बुद्धीचा करीत विकास। अंतःप्रेरणेनें तो सद्गुरूस। सच्छास्त्रास शरण रिघे ॥४२९॥ त्या पावन संगतींत श्रद्धाबळें। त्याचें अंतःकरण प्रतिदिन निवळे। त्याच्या इंद्रियांचा दुराग्रह मावळे। बुद्धि वळे ज्ञान-विज्ञानाकडे ॥४३०॥ तें ज्ञानविज्ञान क्रमें अभ्यासावें। लोकहितार्थ कर्मास न त्रासावें। ऐसा मोक्षमार्ग चालतां अंतर विसावे। सर्वत्र दिसावें ईशमय तया ॥४३१॥ ज्ञान ज्ञेय क्षेत्र[1] क्षेत्रज्ञ। प्रकृति[2]

---

१ गी. अ. १३. २ गी. अ. ७, १३, १४, १६, १७, १८.

पुरुष[१] पुरुषोत्तम[२] सर्वज्ञ। संयमी[३] भक्त[४] गुणातीत[५] स्थित-प्रज्ञ[६]। व्हावया प्राज्ञ हें सर्व जाणावें ॥ ४३२ ॥ प्रज्ञा विषयांकडे न ओढावी। म्हणूनी ती ईशचरणीं जोडावी। मन-इंद्रियें विषयांतुनी काढावीं। हाणूनी पाडावी विषय-चिंता ॥ ४३३ ॥ स्थलीं स्थलीं मूर्ती-मूर्तींत। ईश्वराची विभूति असे रहात। त्या विभूतीचें असावें ध्यानांत। स्थूलातें मनांत स्थान न द्यावें ॥ ४३४ ॥ या ज्ञानीं ध्यानीं भक्ति भरावी। श्रवण-कीर्तनादि क्रिया करावी। अभ्यास-योगाची कांस धरावी। जरी भोगां भावी मन हटेलें ॥ ४३५ ॥ स्वकर्में सर्वहितार्थ लोक-संग्रहार्थ। आचरीत असावें टाकूनी स्वार्थ। सर्वगत सर्वेशपूजनार्थ। तत्फलितार्थ उपयोजावा ॥ ४३६ ॥ येणें रीती ज्ञान भक्ति। ध्यान संयम कर्मशक्ति। व्यष्टीसी देत असे मुक्ति। श्रद्धा विरक्ति निर्मल ॥४३७॥ ताता इष्ट सर्वांग-समुच्चय। समुच्चयीं शांति आत्यंतिक

---

१ गी. अ.२,१३,१५. २ गी. अ.७,१२,१५. ३ गी. अ. ५,६,८. ४ गी. अ. १२. ५ गी. अ. १४. ६ गी. अ. २.

होय। परी ज्यासी ज्या मार्गीं विशेष सोय। तेणें तो ठाय प्रथम आपणावा ॥ ४३८ ॥ व्यष्टींची अंतर्बाह्य परिस्थिति। भिन्न भिन्न असे या जगतीं। म्हणूनी कोणी ज्ञान कोणी भक्ति। कोणी इतर शक्ति प्रथम जागवी ॥ ४३९ ॥ ज्या जीवासी जें अंग सोयीचें। तें त्यासी प्रधान गणायाचें। येणें रीती तुल्यबल सर्व अंगांचें। तुल्य सर्वांचें मुक्ति-सहायत्व ॥ ४४० ॥ देह-मायाभंग सर्वेशसंग। क्रमें जागवी प्रत्येक मोक्षांग। म्हणूनी या सर्व अंगांचा संघ। गणियेला अंग चतुरंग हृदयाचें ॥ ४४१ ॥ चतुरंग मद्-हृदय साधनभूत। सर्व-भूतमोक्ष तातसाध्य निश्चित। तें मद्हृदयाचें हृदय सत्संमत। हें विवेकवंत ओळखतील ॥ ४४२ ॥

सद्गुरुश्रद्धा सच्छास्त्रश्रद्धा। तात उपदेशी जीवा भवबद्धा। परी विवेकवंत जीवा निजात्मश्रद्धा। श्रेष्ठ-तम श्रद्धा तातमतीं ॥ ४४३ ॥ गुरु-गुरूंत सद्गुरु कोण। शास्त्राशास्त्रांत सच्छास्त्र कोण। हें निश्चित करावयाचें कार्य कठीण। निजात्म्यासी पुसून करणें लागे ॥ ४४४ ॥ यासी त्यासी विचारून पुसून। गुरु शास्त्र चांगलें

म्हणून । ठरविलें तरीही हा तो प्रमाण । ठरविण्या प्रमाण निजात्मा असे ॥ ४४५ ॥ तातें अर्जुनासी बोध करून । त्याचें जागविलें विवेकीपण । सांगितलें कीं माझें कथन । विवेकें[1] परीक्षून पाहावें आपुल्या ॥४४६॥ सर्वां हृदयीं राहे ईश्वर । तो आत्म्याचा आत्मा शरण्यवर । त्यासीच शरण रिघावें तोचि पार । पाववील दुस्तर भवसागराचा[2] ॥४४७॥ ऐसेंही सावध केलें अर्जुनासी । निजात्मश्रद्धा जागवायासी । निजात्मश्रद्धे-वांचूनी जवासी । शाश्वत स्थानासी जाणें अशक्य ॥ ४४८ ॥ देह नव्हे निज आत्मा । इंद्रियें नव्हतीं निज आत्मा । मन नव्हे निज आत्मा । निज आत्मा तर्कबुद्धि नव्हे ॥ ४४९ ॥ शुद्ध प्रेमल प्रेमतत्त्व । शुद्ध जिज्ञासु ज्ञानतत्त्व । यांहीं युक्त जें अंतःसत्त्व । तें आत्म-तत्त्व ओळखावें ॥ ४५० ॥ हें जितुकें विकसित आपणांत । तितुकें आणावें उपयोगांत । तत्प्रकाशित तर्कबुद्धीच्या ताजव्यांत । गुरु-शास्त्र-कथित परीक्षीत जावें ॥ ४५१ ॥ आत्मा आज चुकेल उद्यां चुकेल ।

---

१ गी. अ. १८, श्लो. ६३. २ गी. अ. १८, श्लो. ६१, ६२

चुकतां चुकतां चुकणें चुकेल । तत्प्रकाश फांकतां फांकतां फांकेल । अंतीं वांकेल हृदयेशपदीं तो ॥४५२॥ हृदयेश जीवात्म्याचा आत्मा । तो श्रद्धा-विनम्र-जीवात्म्यासी सर्वात्मा । करूनी भेटवील आपुला आत्मा । स्वानंद-महिमा अनिर्वाच्याचा ॥ ४५३ ॥

निरीश्वर सांख्य-सिद्धांतवादी । तया श्रीगीता बोध बोधी । तो ऐकिला हरिभाटें निरुपाधि । विवेक-समाधि लावूनियां ॥ ४५४ ॥ ऐकिला बहू बहू ऐकत । श्रवणें अंतरीं प्रकाश फांकत । मननें मन विनम्र वांकत । श्रीगीता-तातपदीं सदा ॥ ४५५ ॥ तेणें तो बोध-प्रकाश । येथें यथाबुद्धि यथावकाश । त्रुटित अपूर्ण अभ्यासकास । अर्पिला विवेकास चालना द्याया ॥४५६॥

॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

॥ ॐ तत्सत् ब्रह्मार्पणमस्तु ॥

॥ ॐ शांतिः शांतिः शांतिः ॥

——×——

स्थळ प्रत
सं. क्रां०६ नं ११६०
ता. १५-७-३६

॥ ॐ तत्सत् ब्रह्मणे नमः ॥

॥ ॐ श्रीजगद्गुरवे श्रीकृष्णाय नमः ॥

# अनासक्तियोग-परीक्षण

तुम्हां सज्जनां मोक्ष मिळावा ऐसें जरि वाटे ।
फुटूं न द्यावे जड देहाच्या मोहाला फांटे ॥ धृ० ॥
गीताकाव्यीं कविनें कथिला अनासक्तियोग ।
त्या योगाचा अभ्यासी मी करिं हिंसात्याग ॥
म्हणुनी केवळ हिंसात्यागी अनासक्तियोगी ।
सुजनीं व्हावें सदा सर्वदा जगिं हिंसात्यागी ॥
पूर्ण जी अनासक्ति ती । अहिंसाव्रतीं । अन्यथा न ती ।
ही दोषी विचारसरणी ।
निर्दोष मनीं समजूनी । श्रीगीता गांधीजींनीं ।

खलहिंसात्यागिनी ठरवितां ठरेल का कोठें ?।
फुटूं न द्यावें० ॥ १ ॥

ऐकुनि घ्यावें सर्व जनाचें तैसें स्वमनाचें ।
पाहुनि घ्यावें कोण कसा या जगीं नाच नाचे ॥
वाचुनि घ्यावे ग्रंथ शक्य ते शंकाविषयाचे ।
मग मंथावें ज्ञान सर्व हें पुढती श्रीहरिचे ॥
श्रीहरी सर्व मनिं दडे । तयाच्या पुढें । मंथणें पडे ।
जें मिळे ज्ञान यत्नानें ।
मंथावें शांतपणानें । मंथिलां हरी प्रेमानें ।
जें जेव्हां सांगे तें तेव्हां करा तुम्ही नेटें ।
फुटूं न द्यावें० ॥ २ ॥

गीताकाव्यीं कविनें कथिला अनासक्तियोग ।
गीताकाव्यीं कविनें कथिला खलहिंसायोग ॥
फलासक्तियुत खलहिंसा तें रजोगुणी कर्म ।
फलासक्तिरहिता खलहिंसा तो सात्विक धर्म ॥
धर्म हा लोकसंग्रही । खल दुराग्रही । तुडवितां मही ।
हरि शिकवी कांहीं सुजनां ।
त्यांकरवीं खलनिर्दलना । करवूनी शासनरचना ।

रचवी नव जेणें जन इहपर-सुखा सुखें भेटे ।
फुटूं न द्यावे० ॥ ३ ॥

गीतेचा मी भक्त पुरातन मी हरिचा प्यारा ।
गीतागायक नायक माझ्या विचार-आचरा ॥
अनासक्तियोग मीं वाचुनी नमस्कार केला ।
माझ्या खेळाडू श्रीहरिच्या लीलाप्रियतेला ॥
श्रीहरी महात्मा-मनीं । अहिंसा-धुनी । देइ लावुनी ।
भज सांगे दुसरें कांहीं ।
तिसऱ्यासी तिसरें कांहीं । तो तुम्हांसि प्यारे भाई ।
जें जेव्हां सांगे तें तेव्हां करा तुम्ही नेटें ।
फुटूं न द्यावे० ॥ ४ ॥

खला संहरी मंत्र हाच गीतेचा संदेश ।
खलाहिंसात्यागाचा न करी गीता उपदेश ॥
स्थितप्रज्ञ जो क्षात्रवीर्यशाली त्या भक्तानें ।
ईश पुजावा लोकनाशकर्त्यांच्या रक्तानें ॥
वीर जो क्षत्रियेतर । बुद्धिचा स्थिर । ईशकिंकर ।
त्या स्थितप्रज्ञ भक्तानें ।
ईशाची पूजा करणें । सेवुनि जन निजवीर्यानें ।

लोकसंग्रही गीतेचा संदेश असा थाटे ।
फुटूं न द्यावे० ॥ ५ ॥

वैश्य ब्राह्मण शूद्र वृत्तिचा जो कोणी वीर ।
खलहिंसा त्यानें न करावी जरि धरवे धीर ॥
परी वीर जो क्षात्रवीर्यशाली त्या भक्तानें ।
ईश पुजावा लोकनाशकर्त्यांच्या रक्तानें ॥
वीरता आपआपली । करावी भली । परी तत्फलीं ।
आसक्ति मुळिं न ठेवावी ।
निष्कामबुद्धि सेवावी । समदृष्टि जयाजयिं व्हावी ।
मोक्षसंग्रही गीतेचा संदेश असा थाटे ।
फुटूं न द्यावे० ॥ ६ ॥

वर्ण चार वर्णावर्णाचीं कर्मैं ठरलेलीं ।
मोक्षविरोधक कर्म सर्व ही शंका भरलेली ॥
अशी भारतीं स्थिति होती ज्या कालीं आलेली ।
त्या कालीं शंका निरसाया गीता झालेली ॥
कर्म जें आपआपलें । करावें भलें । परी तत्फलें ।
ईशासि जरी अर्पाल ।
आसक्ति मुळिं न ठेवाल । तरि मोक्ष सुखें पावाल ।

मोक्षसंग्रही गीतेचा संदेश असा थाटे ।
फुटूं न द्यावे ॥ ७ ॥

समाजधारक कर्में वर्णीं विभक्त गतकालीं ।
कालगतीनें वर्णविभागा दुरवस्था आली ।
समाजधारक कर्में परि तीं लोकीं कुणि आज ।
सहजस्फूर्तीनें केल्याविण न हो लोककाज ॥
आजही ज्ञानबल हवें । अर्थबल हवें । तसें त्यासवें ।
खलसंहारक बल व्हावें ।
परिचर्याबलही व्हावें । येणेंचि लोक थोरावें ।
लोकसंग्रही गीतेचा संदेश असा थाटे ।
फुटूं न द्यावे० ॥ ८ ॥

लोकसंग्रही मोक्षसंग्रही श्रीगीताग्रंथ ।
समाजधारक जीवा तारक त्यांत थोर पंथ ॥
कर्मयोग जगता शिकवीला ग्रंथ-गायकानें ।
लोकसंग्रही मोक्षसंग्रही लोकनायकानें ॥
ग्रंथ तो अज्ञता हरी । ज्ञान विस्तरी । शांति दे खरी ।
श्रीस्थितप्रज्ञ टिळकांनीं ।
योजिली अमोघा वाणी । श्रीगीतारहस्यगानीं ।

रहस्य तें खलहिंसापथिंचें झाडितसे कांटे।
फुटूं न द्यावें० ॥ ९ ॥

समाजधारक कर्मबळानें समाज थोरावे ।
घडो कर्म तें सात्त्विक राजस तामस वा भावें ॥
सात्त्विक-भावें अनासक्तिनें करितां तें कर्म ।
कर्मयोग तो, तेणें कर्त्या मिळे मोक्षशर्म ॥
योग तो नीट चालतां । येत शमयुता । स्थितप्रज्ञता ।
त्या स्थितप्रज्ञ भक्तानें ।
आमरण कर्मयोगानें । चालुनि जनसेवा करणें ।
कर्मयोगपर गीतेचा संदेश असा थाटे ।
फुटूं न द्यावें० ॥ १० ॥

फलासक्तिनें समाजधारक निजकर्मं करिती
कुणी राजसी कुणी तामसी वृत्ति मनीं वरिती ॥
बुद्धिभेद त्या अज्ञ जनाचा प्रज्ञें न करावा ।
समाजधारक निजकर्मीं त्या निरत असो द्यावा ॥
कर्म तें अनासक्तिनें । ईशभक्तिनें । योगयुक्तिनें ।
करण्यासि त्यासि शिकवावें ।
करुनियां स्वयें स्थिर भावें । भावस्थिर त्यासि करावें ।

कर्मयोगपर गीतेचा संदेश असा थाटे ।
फुटूं न द्यावें० ॥ ११ ॥

क्षत्रियवीरा समाजहिंसक-हिंसा प्राप्त असे ।
हिंसक तो जरि त्या वीराचा प्रेमी आप्त असे ॥
आप्तप्रेमें समाजहिंसक-हिंसा-त्याग करी ।
मोह असे तो, धर्म नसे तो, नसे सुनीति खरी ॥
वीर जो खरा क्षत्रिय । स्वधर्मप्रिय । सुनीतिप्रिय ।
तो मोह आप्तप्रेमाचा ।
आंवरुनी मानव्याचा । होवो सत्सेवक साचा ।
कर्मयोगपर गीतेचा संदेश असा थाटे ।
फुटूं न द्यावें० ॥ १२ ॥

आत्ममोह सारणें दूर हें दिव्य असे थोर ।
आप्त मारणें विश्वकारणें कर्म असे घोर ॥
मरो विश्व आप्ताच्या हातें आप्तावरि हात ।
आप्तमोहवश आप्त न टाकी करावया घात ॥
मोह तो दुस्तर स्वार्थ । मोह-तरणार्थ । व्यर्थ पुरुषार्थ ।
ही मोहाची दुस्तरता ।
आप्तेष्टसंगसुखनिरता । पाहुनी अहिंसापरता ।

गीताहृद्गत म्हणुनि शिकविणें कवित्व हें मोठें ।
फुटूं न द्यावे० ॥ १३ ॥

गीताकाव्यीं कविनें कथिला अनासक्तियोग ।
कथिलें कीं निजधर्म आचरा त्यजुनि मोहभोग ॥
समाजधारक निजधर्म क्षत्रिया क्षात्रयुद्ध ।
तें त्यजिणें आप्ताच्या मोहें अधर्म तो शुद्ध ॥
मोह तो दुस्तर स्वार्थ । म्हणुनि गीतार्थ । सरल तो व्यर्थ
ही दोषी विचारसरणी ।
निर्दोष मनीं समजूनी । श्रीगीता गांधीजींनीं ।
खलहिंसात्यागिनी ठरवितां ठरेल का कोठें ? ।
फुटूं न द्यावे० ॥ १४ ॥

धर्माचा आदर्श दर्शवी गीताकाव्यकवि ।
व्यवहारीं दुर्घट घटना तो कुठें कुठें शिकवी ॥
ऐसें म्हणुनि महात्मा म्हणती एका अध्यायीं ।
स्थितप्रज्ञ परमेश एकला दुजा कुणी नाहीं ॥
मीपणा दुस्तर स्वार्थ । अहं-तरणार्थ । व्यर्थ पुरुषार्थ ।
ही अहंकारदुस्तरता ।
देहादिसंगसुखनिरता । पाहुनी अहिंसापरता ।

गीताहृद्गत म्हणुनि ठरवितां ठरेल का कोठें ?।

फुटूं न द्यावे० ॥ १५ ॥

स्थितप्रज्ञ संहरूनि कोणा संहरीत नाहीं।
संहारक कर्मांच्या बंधें बद्ध होत नाहीं ॥
या गीता-श्लोकावरि टीका गांधीजींची ही।
स्थितप्रज्ञ परमेश एकला दुजा कुणी नाहीं ॥
मीपणा दुस्तर स्वार्थ। म्हणुनि गीतार्थ। सरल तो व्यर्थ।
ही दोषी विचारसरणी।
निर्दोष मनीं समजूनी। श्रीगीता गांधीजींनी।
खलहिंसात्यागिनी ठरवितां ठरेल का कोठें ?।

फुटूं न द्यावे० ॥ १६ ॥

ऐहिक युद्ध स्थितप्रज्ञलक्षणीं येत नाहीं।
ऐसें म्हणती गांधिजी प्रास्ताविक वचनांहीं ॥
ऐहिक-युद्धत्याग युद्ध वा स्थितप्रज्ञलक्षणीं।
येत नसे हें तत्त्व ओळखे तत्त्वविवेकें क्षणीं ॥
मीपणा दुस्तर स्वार्थ। जो तरे सार्थ। करुनि पुरुषार्थ।
तो स्थितप्रज्ञ जाणावा।
संन्यासि कर्मयोगी वा। क्षत्रिय क्षत्रियेतर वा।

युद्धायुद्ध तयाच्या लक्षींणि यास्तव ना भेटे ।
फुटूं न द्यावे ॥ १७ ॥

स्थितप्रज्ञ संहरुनि कोणा संहरीत नाहीं ।
संहारक कर्मांच्या बंधें बद्ध होत नाहीं ॥
कारण याचें अनासक्तिनें ईशभक्तिनें तो ।
कर्ता ईश तयाचें केवळ कर्मयंत्र होतो ॥
स्पष्ट हा सरळ गीतार्थ । असे हिंसार्थ । म्हणुनि तो व्यर्थ ।
ही दोषी विचारसरणी ।
निर्दोष मनीं समजूनी । श्रीगीता गांधीजींनीं ।
खलहिंसात्यागिनी ठरवितां ठरेल का कोठें ? ।
फुटूं न द्यावे० ॥ १८ ॥

भारतयुद्धीं जेते रडले दुःख करुनि फार ।
यांत युद्ध-वैयर्थ्यचि शिकवी श्रीभारतकार ॥
ऐसें म्हणती गांधीजी, हें मंदा पचणार ।
मंदबुद्धि जो नाहीं त्याला नाहीं रुचणार ॥
दुःख तें धर्म्यही रणीं । आत्ममारणीं । फार हो मनीं ।
तरिही निजधर्माचार ।
क्षत्रिया युक्त हें सार । शिकवी श्रीभारतकार ।

धर्माचा आदर्श भारतीं धर्मपरा भेटे ।
फुटूं न द्यावे० ॥ १९ ॥

कौरव-पांडव-युद्ध कवीची कल्पनाच केवळ ।
मनुज-मनोगत युद्ध रंगवी व्यासकल्पनाबळ ॥
असो सत्य हें, तरिहि सत्य कीं कौरवसम पापी ।
पांडवसम सुजनां स्वजनांसिहि तापविती तापीं ॥
तैं लढा तत्समनिं पडे । मोहिं मन बुडे । क्षत्रियहि रडे ।
हा लढा मनोगत युद्धीं ।
भाग एक याची शुद्धि । घेउनी व्यासकविबुद्धि ।
अनासक्तियुत युद्ध शिकविते कृष्णमुखावाटे ।
फुटूं न द्यावे० ॥ २० ॥

कौरवसम-खल-मर्दन-हेतुक लढा धर्मरक्त ।
समताबुद्धि जयाजयिं ठेवुनि करो ईशभक्त ॥
फलासक्तिविरहिता भक्ति ही पूर्ण अनासक्ति ।
अनासक्तियुत युद्ध शिकविते व्यासधर्मभक्ति ॥
पूर्ण जी अनासक्ति ती । अहिंसाव्रतीं । अन्यथा न ती ।
ही दोषी विचारसरणी ।
निर्दोष मनीं समजूनी । श्रीगीता गांधीजींनीं ।

खलहिंसात्यागिनी ठरवितां ठरेल का कोठें ? ।
फुटूं न द्यावे० ॥ २१ ॥

कौरवसम-खलमर्दन सोडा क्षात्रधर्म सोडा ।
क्षात्रधर्म तो अधर्म केवळ पापाचा खोडा ॥
सदा अहिंसा निरपवाद ती पूर्ण अनासक्ति
सदा अहिंसा निरपवाद ती पूर्ण ईशभक्ति ॥
ईश ही अहिंसा-धुनी । महात्मा-मनीं । देइ लावुनी ।
मज सांगे दुसरें कांहीं ।
तिसऱ्यासी तिसरें कांहीं । तो तुम्हांसि प्यारे भाई ।
जें जेव्हां सांगे तें तेव्हां करा तुम्ही नेटें ।
फुटूं न द्यावे० ॥ २२ ॥

सोडूं आम्ही आंग्लविरोधी क्षात्रधर्म सोडूं ॥
आंग्लेतर रिपु घरचे परके यथान्याय झोडूं ॥
गोलमेजपरिषदीं महात्मा या अर्थी बोलले ।
जर्मनांग्लसंगरीं महात्मा या अर्थी चालले ॥
ईश ही अहिंसा-धुनी । महात्मा-मनीं । देइ लावुनी ।
मज सांगे दुसरें कांहीं ।
तिसऱ्यासी तिसरें कांहीं । तो तुम्हांसि प्यारे भाई ।

जें जेव्हां सांगे तें तेव्हां करा तुम्ही नेटें ।
फुटूं न द्यावे० ॥ २३ ॥

द्वितीय गीताध्याय न शिकवी युद्धव्यवहार ।
स्थितप्रज्ञ-लक्षणें त्यांत दे श्रीगीताकार ॥
यास्तव ऐहिक युद्ध नसे त्या कविला मुळिं मान्य ।
तर्क असा हा गांधिजींचा तार्किकां न मान्य ॥
पार्थ तो युद्धपंडित । मोहखंडित । शोकदंडित ।
त्या युद्धपंडिता पार्था ।
ती हवी कशासी वार्ता । जी युद्धव्यवहारार्था ।
त्यासि हवी ती वार्ता कवि कथि कृष्णमुखावाटे ।
फुटूं न द्यावे० ॥ २४ ॥

कौरव-पांडव-युद्ध कुटुंबी भांडण सामान्य ।
तदर्थ केवळ कृति गीतेसम रची न कवि मान्य ॥
असो सत्य हें, तरिहि सत्य कीं कौरवसम पापी ।
पांडवसम सुजनां स्वजनांसहि तापत्रिती तापीं ॥
तैं लढा तप्त-मनिं पडे । मोहिं न बुडे । क्षत्रियहि रडे ।
हा लढा मनोगत-युद्धीं ।
भाग एक याची शुद्धि । घेउनि व्यासकविबुद्धि ।

अनासक्तियुत युद्ध शिकविते कृष्णमुखावाटे ।
फुटूं न द्यावे० ॥ २५ ॥

अनासक्तिच्या पोटीं अहिंसा सहज सर्व येई ।
अनासक्तिच्या पोटीं हिंसा कसलीहि न येई ॥
गांधीजींचें मत हें गीताकविसि मान्य नाहीं ।
त्यासि अहिंसा निरपवाद हा परमधर्म नाहीं ॥
धर्म तो अहिंसा परम । ऐकुनी गरम । वीरही नरम ।
होतील धर्म्यही युद्धीं ।
या भवितव्याची शुद्धि । घेउनी व्यासकविबुद्धि ।
अनासक्तियुत युद्ध शिकविते कृष्णमुखावाटे ।
फुटूं न द्यावे० ॥ २६ ॥

आसक्तीविण होइ न तें तें त्याज्य असे कर्म ।
गांधीजी म्हणती कीं ऐसें गीतेचें मर्म ॥
भ्रांति असे ही गीता सांगे त्याज्य न निजधर्म :
फलासक्ति मनिं भरली तरिही त्याज्य न निजकर्म ॥
कर्म तें अनासक्तिनें । ईशभक्तिनें । युक्तियुक्तिनें ।
करण्यासि शिकावें सुजनीं ।
येणेंचि शांति जनिं विजनीं । मनिं अखंड राहे भरुनी ।

मराठी ग्रंथ संग्रहालय ... स्थळ प्रत ... सं. ... नं. ... ता.

कर्मयोगपर गीतेचा संदेश असा थाटे ।
फुटूं न द्यावें० ॥ २७ ॥

आसक्तीविण अशक्य हिंसा गांधीजी म्हणती ।
शक्य असे निश्चयें सांगते माझी अनुभूति ॥
फलासक्ति मनिं भरली तरिही खलहिंसाकर्म ।
नसे क्षत्रिया त्याज्य असे हें गीतेचें मर्म ॥
कर्म तें अनासक्तिनें । ईशभक्तिनें । युक्तियुक्तिनें ।
करण्यासि शिकावें सुजनीं ।
येणेंचि शांति जनिं विजनीं । मनिं अखंड राहे भरुनी ।
कर्मयोगपर गीतेचा संदेश असा थाटे ।
फुटूं न द्यावें० ॥ २८ ॥

अनासक्तिचा गीताकविचा अर्थ न ये कामीं ।
तरी तियेचा अर्थ यथामति विस्तृत करुं आम्ही ॥
ऐसें म्हणुनी गांधीजी त्या शब्दाचा अर्थ ।
विस्तृत करिती जेणें साधे त्यांचा इष्टार्थ ॥
पूर्ण जी अनासक्ति ती । अहिंसाव्रतीं । अन्यथा न ती ।
हा असा अर्थविस्तार ।
कोणीहि करो करणार । येणें श्रीगीताकार ।

समाजहिंसक-हिंसा-त्यागी ठरेल का कोठें ?।
फुटूं न द्यावे० ॥ २९ ॥

मनुज-मनोगत युद्ध रंगवी व्यास-कल्पनाबळ ।
कौरव-पांडव-युद्धयोजना कल्पूनी केवळ ॥
युद्ध बाह्य कल्पिलें मनोगत युद्धा खुलवाया ।
अशी कल्पना गांधीजींची तीहि असे वायां ॥
युद्ध जें मनीं मानवी । तें महाकवि । व्यास दाखवी ।
सुस्पष्ट सरल शब्दांनीं ।
तें युद्ध फलाच्या ध्यानीं । जन्म घे म्हणुनि तो ज्ञानी ।
अनासक्तिचा ईशभक्तिचा पाठ पढवि थाटें ।
फुटूं न द्यावे० ॥ ३० ॥

अनासक्तियोगाची सक्ती गीतेवरि झाली ।
त्या सक्तीचा निषेध करण्या गीतेचा वाली ॥
पुढें न होई कुणी भक्तवर अनासक्तिशाली ।
पाहुनि हें वाटलें नवल मनिं खळबळ बहु झाली ॥
वाटलें टिळक आज ते । जरी राहते । तरी वाहते ।
काळजी नीट गीतेची ।
वाटुनि हें माझ्या मनिंची । स्वस्थता पळाली साची ।

यथाशक्ति यास्तव सक्ती ती निषेधिली नेटें ।
फुटूं न द्यावें० ॥ ३१ ॥

आंवरतों हें चऱ्हाट माझें मी हरिचा भाट ।
माझ्या नीरस भाटपणाचा आहे बोभाट ॥
उणीव माझी पुरी जाणतों काय करूं सांगा ।
हट्टी हरि हा हटकुनि झटतो कधीं कधीं अंगा ॥
बोल बोल हा तुझ्याच बोलीं बोल अरे भाई ।
नीरस रसना तुझी असूं दे त्याचें तुज कांई ॥
हट्ट असा हा हरि धरितो मग मी करितां धीर ।
बोल टाकितों बोलुनि हरिचा मी वेडा पीर ॥
बोल हा हरी बोलिला । मारिं मी खला । तारिं साधुला ।
*मत्कर्म करी जो वीर ।

---

*मत्कर्मकृत् मत्परमः......(गीता ११-५५,); हरीच्या या बोलाची विशेष फोड व **अनासक्तियोगाचें** अर्थात् **चकारातीत भूमिकेचें** एका विशेष प्रसंगींचें निरूपण **परिशिष्टांत** पहावयास सांपडेल. हें निरूपण आपल्या अपेक्षित मरणापूर्वीचें मुमुक्षुजनाला शेवटचें सांगणें म्हणून ता. ६।१२।२४ रोजीं से. बापटांनीं प्रसिद्ध केलें होतें.

—**संग्राहक**

होऊनि भूर्ति निर्वैर । निष्कामभक्तिगंभीर ।
मत्पर तो प्रिय भक्त पांडवा सख्या मला भेटे ।
फुटूं न द्यावे जड देहाच्या मोहाळा फांटे ॥ ३२ ॥

॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

॥ ॐ तत्सत् ब्रह्मार्पणमस्तु ॥

॥ ॐ शांतिः शांतिः शांतिः ॥

——×——

# परिशिष्ट

## नास्ति सत्यात्परोधर्मः ।

एकच एक ब्रह्म हें परात्पर सत्य आहे. या एका परात्पर सत्याच्या पोटांत अनेक अंगभूत सत्यें आहेत. या अनेक सत्यांचा गलबला म्हणजेच एक ब्रह्माच्या पोटांतील संसार. नानाविध सत्यांची झुंज, सत्यांचा मेळ, एका सत्याचा उत्कर्ष, दुसऱ्याचा अपकर्ष, भूमिकाभेदानें सत्यभेद, सत्यभेदानें असत्यांचा घटोत्कची बाजार, असत्यसत्य या द्वैताचा *भूमिकाभेदामुळें उदय, असत्य-सत्यांची झुंज, असत्यसेवेनें पारमार्थिक अवनति व

---

* असत्य-सत्य या द्वैतांतून दुष्ट व साधु या भूमिका-द्वंद्वाचा व दुष्टविनाश व साधुपरित्राण या दिव्य कर्मद्वंद्वाचा उदय होतो.

परमदुःख, सत्यसेवेनें पारमार्थिक उन्नति व परमसुख, परमदुःखाच्या तडाख्यानें प्रत्येक संसारी व्यक्तीची अखेर सत्यसेवेकडे प्रवृत्ति, शेवटीं संसारांतील नानाविध सत्यें एका परम सत्याच्या–एकमेवाद्वितीयब्रह्माच्या–पोटांत असून त्याचींच संसारी लीलारूपें आहेत हा स्वानुभव आणि त्यायोगें नित्यानंदप्राप्ति अथवा मोक्ष असें हें ब्रह्मसंसाराचें नाटक आहे. या नाटकांत अहिंसा हेंच परमसत्य अशी एक भूमिका असते, न्याय हेंच परम-सत्य अशी दुसरी भूमिका असते, निरपवाद क्षमा–यथान्याय दण्ड, निरपवाद लीनता–यथोचित अभिमान, अशा नानाविध भूमिका या नाटकांत असतात. वेळो-वेळीं स्वहृदयांत खोल उडी घेऊन आपआपली भूमिका ओळखावी व भूमिकेनुसार आपापलें परमसत्य जाणून त्या सत्याची यथाशक्ति, यथोचित, निरपेक्ष सेवा करावी हा मोक्षसाधक धर्म आहे. सत्याची ही शुद्ध सेवा कधीं अहिंसासाधक असेल, कधीं अहिंसाबाधक असेल. प्रस्तुत

कार्यांत आजपर्यंत माझी सत्यसेवा अहिंसासाधक तऱ्हेनें झाली, यापुढें कदाचित् अहिंसाबाधक तऱ्हेनें मला सत्यसेवा करावी लागणार आहे. विश्वहित हें माझ्या भूमिकेनुसार माझें परमसत्य आहे. मुळशीकरांचें हित, महाराष्ट्रहित, राष्ट्रहित, यथान्याय दण्ड, यथोचित आत्माभिमान–लीनता–क्षमा–अहिंसा हीं माझ्या भूमिकेनुसार माझीं दुसरीं पूजनीय सत्यें आहेत. या सत्यांची आग्रहानें जयाजय–लाभालाभ–सुखासुखनिरपेक्ष यथोचित सेवा करणें हाच माझा शुद्ध सत्याग्रह.

या शुद्ध सत्याग्रहानें शुद्ध सत्यस्वरूप परमेश्वर माझ्या महाराष्ट्रावर व राष्ट्रावर संतुष्ट होईल व आमच्या लौकिक व पारमार्थिक मुक्तीचा दिवस जवळ आणील. प्रत्येक व्यक्तीचें व व्यक्तिसमूहाचें **पारमार्थिक** हित, लौकिकदृष्ट्या हितकर अथवा अहितकर दिसणाऱ्या अनंतविध प्रसंगांनीं, अनेक जन्मवर क्रमशः साधीत शेवटीं प्रत्येकास स्वस्वरूप करणें, हें श्रीहरीच्या संसार-

नाटकाचें हृद्गत आहे. प्रतिपक्षांतील कोणत्याही व्यक्ती-विषयीं माझ्या मनांत द्वेषभाव नाहीं, वैरभाव नाहीं. ब्रह्म-संसारनाटकाच्या प्रस्तुत मुळशी अंकांत प्रतिपक्षी आमचा प्रतिपक्षी आहे. नाटकांतील व्यवस्थेनुसार आम्हांला त्याशीं वैरीपणाचा खेळ खेळावयाचा आहे.पण हें वैरी-पणाचें भूमिकाकार्य करतांना माझ्या अंतरंगांत निर्वैरता नांदते. नाटकांतील ब्रह्मकल्पित संविधानकानुसार जयाजय —लाभालाभ-सुखासुख आमच्या व प्रतिपक्षाच्या वांट्याला येत आहे व येणार आहे. नाटकाचा शेवटला शेवट सर्वांना गोड व्हावयाचा अशी नाटककाराची व्यवस्था आहे. मीं नेमून दिलेलें कर्म नीटपणें करावें, मी सर्व-श्रेष्ठ परमसत्य आहें हें ओळखून मदंतर्गत नानाविध संसारी सत्यांविषयीं—असत्यांविषयीं आसक्तिविरहित, मजविषयीं भक्तिपरायण व माझ्या लीलारूपांच्या सर्व-भूतांच्या संबंधानें वैरभावरहित असावें म्हणजे माझी प्राप्ति—नित्यानंदप्राप्ति—होते.

मत्कर्मकृन्मत्परमो मद्भक्तः संगवर्जितः
निर्वैरः सर्वभूतेषु यः स मामेति पांडव

असें नाटककारानें आपलें हृद्गत सांगून ठेविलें आहे व तें हृद्गत माझ्या हृदयांत श्रीहरीनें सांठविलें आहे. विश्वहित अहिंसेनेंच साधेल, विश्वहित न्यायानेंच साधेल, क्षमेनेंच साधेल...इत्यादि नानाविध चकारपक्ष नाटकास रंग चढविण्यासाठीं नाटककारानें योजिलेले आहेत. मनुष्य नाटककाराच्या योजनेनुसार क्रमशः अनेक भूमिका घेत असतो, अनेक चकारांचा क्रमशः पुरस्कार करीत असतो. शेवटीं नाटककाराच्या योजनेची त्याला ओळख होते, चकारांच्या मूलहेतूची त्याला जाणीव येते आणि तो चकारातीत होतो. यथोचित अहिंसा, यथोचित न्याय, यथोचित क्षमा...प्रसंगानुसार विश्व-हितसाधक होत असल्याची जाणीव या चकारातीत श्रेष्ठ भूमिकेंत असते. पक्षाग्रह या भूमिकेवर असूं शकत नाहीं. ब्रह्मसंसार नाटकाचा नाटककार जो श्रीहरि

त्याशीं समरसता या भूमिकेवर प्राप्त होते. ब्रह्मभावाची–नित्यानंदाची–स्थिति येथें प्राप्त होते. या ब्राह्मी स्थितींत –मुक्त स्थितींत–असलेला मनुष्य अन्य भूमिकांवर असलेल्या बांधवांची त्या त्या भूमिकेनुसार सेवा करून त्यांना मोक्षमार्गावर पुढें पुढें नेण्याचें काम करीत असतो. या कार्यांत केव्हां अहिंसेचा, केव्हां हिंसेचा; केव्हां क्षमेचा, केव्हां दण्डाचा; केव्हां दयेचा, केव्हां न्यायाचा पुरस्कार त्याला करावा लागतो. मुळशीच्या कार्यांत अहिंसेचा आजवर पुरस्कार करून आतां अहिंसेचा पुरस्कार न करणें मला प्राप्त झालें आहे, तें माझ्या चकारातीत विश्वहितैकतत्पर भूमिकेच्या दृष्टीनें प्राप्त झालें आहे. ही भूमिका प्रत्येकास हृदयाच्या हृदयांत सर्वकाल प्राप्त आहे. प्रत्येकजण अंतर्मुख होऊन त्या भूमिकेवर केव्हां केव्हां आरूढ होऊं शकतो व तेथील चकारातीत दृष्टि आपली करूं शकतो. ही दृष्टि पूर्णमुक्त स्थितींत सर्वथा अचल असते व मुक्तामुक्तस्थितींत सर्वथा अचल नसते, चंचल

असते, येते व जाते, जाते व येते. वेळोवेळीं हृदयांत खोल उडी अथवा बुडी घेऊन ही दृष्टि कोणालाही थोडा वेळ प्राप्त करून घेतां येते आणि तदनुसार आपला व अंशतः इतरांचा मोक्षमार्ग ठरवितां येतो.

सत्यनिष्ठ होऊन यथाशक्ति क्रमशः सत्यसेवा करीत करीत परात्पर सत्यस्वरूप परब्रह्मनामधारक श्रीहरीशीं एकरूप होण्यांतच मोक्ष–नित्यानंद–आहे. सत्याग्रही, सत्यस्वरूप श्रीहरि सर्वांस शीघ्र सत्यनिष्ठ करो.

—मुळशीचा पूर्णविराम.

८७८९

REFBK-0005779

REFBK-0005779

# भारतीय प्राणयज्ञदल

१. 'भारतीय प्राणयज्ञदल' ही संस्था पक्षातीत आहे.

२. भारतांत लवकर एकजूट होऊन तो लवकर सुटावा हें संस्थेचें ध्येय आहे.

३. कॉंग्रेसपक्षाचे व कॉंग्रेसविरुद्ध पक्षांचे नेते, हिंदूंचे व मुसलमानांचे व हरिजनांचे नेते, कम्युनिस्ट, सोशॅलिस्ट, भांडवलदार, मजूर, शेतकरी वगैरे नव्या रीतीनें संघटित झालेल्या भारतीय वर्गावर्गांचे नेते या सर्वांनीं एकत्र जमून भारतीय स्वराज्यघटनेचा मसुदा लवकर तयार करावा. आपसांतील वाद विकोपाला नेऊं नयेत ही ज्यांची उत्कट इच्छा आहे अशा स्वातंत्र्यप्रेमी भारतीयांची ही संस्था आहे.

४. नेत्याची एकजूट होण्यासाठीं, हिंदु आणि मुसलमान, हिंदु आणि हरिजन यांजमधील विकोपास जाणारीं, विकोपास जाऊं पहाणारीं भांडणें वेळींच शांत होण्यासाठीं प्राणयज्ञाची केव्हां केव्हां आवश्यकता आहे असें ज्यांना उत्कटतेनें वाटूं लागलें आहे, अशांची ही संस्था आहे. संस्थेंत दाखल होऊं इच्छिणारांनीं (अर्थात भारताच्या जुटीसाठीं प्राणयज्ञ करूं इच्छिणारांनीं) मला भेटावें वा लिहावें.

३५४ सदाशिव पेठ, पुणें २.] पां. म. बापट.

**शंकितांसाठीं स्पष्टीकरणः —**

'प्राणयज्ञ' म्हणजे 'स्वप्राणयज्ञ'. 'पक्षातीत' म्हणजे सर्वपक्षसंग्रही, कलम ३ मध्यें सांगितलेल्या व न सांगितलेल्या सर्व पक्षांतील भारतीयांना घेणारी, अर्थात् निरपवाद-अहिंसाधर्मवादी व सापवाद-अहिंसाधर्मवादी या दोघांनाहि घेणारी. सापवाद-अहिंसाधर्मवाद्यानें या संस्थेंत निरपवाद अहिंसाधर्मवाद्याशीं भारताच्या जुटीसाठीं पूर्ण सहकार्य करावयाचें, त्याच्याइतकेंच अहिंसाप्रधान आचरण ठेवावयाचें.

प्राणयज्ञदलाच्या (स्वप्राणयज्ञदलाच्या) शाखा दोन. (१) नेत्यांची एकजूट होण्यासाठीं स्वप्राणयज्ञ करूं इच्छिणारे एका शाखेचे घटक. (२) हिंदु आणि मुसलमान, हिंदु आणि हरिजन यांजमधील विकोपास जाणारीं, विकोपास जाऊं पाहणारीं भांडणें वेळींच शांत होण्यासाठीं स्वप्राणयज्ञ करूं इच्छिणारे दुसऱ्या शाखेचे घटक. नेत्यांच्या एकजुटीचें निदर्शक भारतीय स्वराज्यघटनेचा मसुदा तयार होणें. दलाच्या दोन्ही शाखांत नांव घालूं इच्छिणारा तसें करूं शकतो.—

३५४ सदाशिव पेठ, पुणें २.] **पां. म. बापट.**